अहवाल क्रमांक :१३३

पंचायती राज समिती

(२०१०-२०११)

(बारावी महाराष्ट्र विधानसभा)

सिंधुदुर्ग, धुळे, लातूर व अमरावती जिल्हा परिषदांच्या सन २००४-२००५ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात

आठवा अहवाल

(सदर अहवाल दिनांक २२ डिसेंबर, २०११ रोजी विधानसभेस / विधानपरिषदेस सादर करण्यात आला.)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, नागपूर
२०११

पंचायती राज समिती

(२०१०-२०११)

(बारावी महाराष्ट्र विधानसभा)

सिंधुदुर्ग, धुळे, लातूर व अमरावती जिल्हा परिषदांच्या
सन २००४-२००५ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात

आठवा अहवाल

पंचायती राज समिती
(२०१०-२०११)

समिती प्रमुख :

१. श्री. बबनराव शिंदे, वि.स.स.

समिती सदस्य :

२. ॲड, के.सी.पाडवी, वि.स.स.

३. श्री. माधवराव पवार, वि.स.स.

४. श्री. हणमंतराव पाटील-बेटमोगरेकर, वि.स.स.

५. श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स.

६. श्री. दिलीपकुमार सानंदा, वि.स.स.

७. श्री. भाऊसाहेब कांबळे, वि.स.स.

८. श्री. बच्चू उर्फ ओमप्रकाश कडू, वि.स.स.

९. श्री. उदय सामंत, वि.स.स.

१०. श्री. बापुसाहेब पठारे, वि.स.स.

११. श्री. आण्णा बनसोडे, वि.स.स.

१२. श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.

१३. श्री. खुशाल बोपचे, वि.स.स.

१४. श्री. सुरेश खाडे, वि.स.स

१५. श्री. चंद्रशेखर बावनकुळे, वि.स.स.

१६. श्री. विष्णू सावरा, वि.स.स.

१७. श्री. अनिल भैय्या राठोड, वि.स.स.

१८. श्री. विजयराव औटी, वि.स.स.

१९. श्री. दादाजी भुसे, वि.स.स.

२०. श्री. नितीन भोसले, वि.स.स.

२१. प्रा. सुरेश नवले, वि.प.स.

२२. श्री. विक्रम काळे, वि.प.स.

२३. ॲड उषा दराडे, वि.प.स.

२४. श्री. सय्यद पाशा पटेल, वि.प.स.

२५. श्री. दिवाकर रावते, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव.

श्री.भाऊसाहेब कांबळे, सह सचिव.

श्री.ना.रा.थिटे, अवर सचिव.

श्री.प्र.स.मयेकर, कक्ष अधिकारी.

श्री.सुभाष नलावडे, कक्ष अधिकारी.

पंचायती राज समिती
(२००८-२००९)

समिती प्रमुख :

१. श्री. सुभाष ठाकरे, वि.स.स.

समिती सदस्य :

*२. श्री. राजन पाटील, वि.स.स.

३. श्री. रमेशभाई कदम, वि.स.स.

४. श्री. माणिकराव जगताप, वि.स.स.

५. श्री. संपतराव अवघडे, वि.स.स.

६. श्री. श्रीनिवास देशमुख (गोरठेकर), वि.स.स.

**७. रिक्त

८. श्री. पी.एन.पाटील, वि.स.स.

९. श्री. सुभाष बने, वि.स.स.

१०. श्री. राजेंद्र मुळक, वि.स.स.

११. श्री. पद्माकर वळवी, वि.स.स.

१२. श्री. डी.एस.अहिरे, वि.स.स.

१३. श्री. आशिष जयस्वाल, वि.स.स.

१४. श्री. तुकाराम सुर्वे, वि.स.स

१५. श्री. अण्णासाहेब माने-पाटील, वि.स.स.

१६. श्रीमती अनुसया खेडकर, वि.स.स.

१७. श्री. अतुल देशकर, वि.स.स.

१८. श्री. टी.पी.कांबळे, वि.स.स.

१९. श्री. विष्णू सावरा, वि.स.स.

२०. श्री. हेमंत पटले, वि.स.स.

२१. श्री. राजन तेली, वि.प.स.

२२. श्री. एम.एम.शेख, वि.प.स.

२३. श्री. विक्रम काळे, वि.प.स.

२४. श्री. दिवाकर रावते, वि.प.स.

२५. श्री. रामनाथ मोते, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

श्री. अनंत कळसे, प्रधान सचिव.

श्री. भाऊसाहेब कांबळे, सह सचिव.

श्री. वि.वा.देशमुख, उप सचिव.

श्री. ता.नि.मिसाळ, अवर सचिव.

---

* सन्माननीय सदस्य श्री.नानाभाऊ पंचबुद्धे यांचा मंत्रिमंडळात राज्यमंत्री म्हणून समोवश झालेला असल्यामुळे रिक्त झालेल्या पदावर सन्मानलीय सदस्य श्री.राजन पाटील, वि.स.स. यांची दिनांक २९ जानेवारी, २००९ रोजी नामनियुक्ती करण्यात आली.

** सन्माननीय सदस्य श्री.विजय वडेट्टीवार यांचा मंत्रिमंडळात राज्यमंत्री म्हणून समावेश झालेला असल्यामुळे पद रिक्त.

(नऊ)

प्रस्तावना

मी, पंचायती राज समितीचा 'समिती प्रमुख' या नात्याने समितीने अधिकार दिल्यावरुन पंचायती राज समितीचा आठवा अहवाल सादर करीत आहे.

सन २०१०-२०११ करिता समिती दिनांक ४ मार्च, २०१० रोजी गठित झाली. महाराष्ट्र विधानसभा नियमावलीतील नियम २४० अन्वये विधानमंडळाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या जिल्हा परिषदेच्या वार्षिक प्रशासन अहवालाची तसेच महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल व एकत्रित वित्तीय व महसुली लेखे यांच्या परीक्षणाची कामे प्रामुख्याने या समितीकडे सोपविण्यात आलेली आहेत.

सन २००४-२००५ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात समितीने सिंधुदुर्ग, धुळे, लातूर व अमरावती या जिल्हा परिषदांची सखोल तपासणी केली.

समितीने सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेस दिनांक २८, २९, ३० व ३१ जानेवारी, २००९ रोजी भेट देऊन श्री.राहुल रंजन महिवाल, मुख्य कार्यकारी अधिकारी व श्री.एस.बी.शेळके, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, (वरिष्ठ) यांची साक्ष घेतली.

समितीने धुळे जिल्हा परिषदेस दिनांक १०, ११ व १२ फेब्रुवारी, २००९ रोजी भेट देऊन श्री.दिपेंद्र सिंह कुशावह, मुख्य कार्यकारी अधिकारी व श्री.ह.ना.कोकणी, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, यांची साक्ष घेतली.

समितीने लातूर जिल्हा परिषदेस दिनांक १, २ व ३ जुलै, २००९ रोजी भेट देऊन डॉ.प्रविण गेडाम, मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री.बिभिषण तांबडे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, लातूर जिल्हा परिषद यांची साक्ष घेतली.

समितीने अमरावती जिल्हा परिषदेस दिनांक ४, ५, ६ व ७ ऑगस्ट, २००९ रोजी भेट देऊन श्री.ओमप्रकाश बकोरीया, मुख्य कार्यकारी अधिकारी व श्री.एम.एच.हुसैन, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, अमरावती जिल्हा परिषद यांची साक्ष घेतली.

सन २०१०-२०११ करिता गठीत झालेल्या समितीने सिंधुदुर्ग, धुळे, लातूर व अमरावती जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या, तसेच साक्षीचे वेळी संबंधित अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे उपस्थित झालेल्या मुद्यांबाबत अधिक माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीने अनुक्रमे दिनांक १५ नोव्हेंबर, २०१० रोजी जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग व धुळे, दिनांक ८ फेब्रुवारी, २०११ व १ मार्च, २०११ रोजी जिल्हा परिषद, लातूर व दिनांक २१ फेब्रुवारी, २०११ रोजी जिल्हा परिषद, अमरावती संदर्भात मंत्रालयीन विभागाच्या सचिवांच्या/प्रतिनिधींच्या साक्षी घेतल्या.

(दहा)

मंत्रालयीन विभागीय सचिवांचे साक्षीचेवेळी श्री. ठाकरे, सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, श्रीमती शर्वरी गोखले, अतिरिक्त मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, श्री. संजय कुमार, प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, श्री.सतिश गवई, प्रधान सचिव, सामाजिक न्याय विभाग, श्रीमती मालिनी शंकर, प्रधान सचिव, पाणीपुरवठा विभाग यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीच्या कामकाजात केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे.

तसेच जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकरी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांनी साक्षीच्या वेळी समितीला माहिती पुरवून केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांचीही आभारी आहे.

समितीने केलेल्या कामकाजाचा संक्षिप्त वृत्तांत अहवालाच्या शेवटी "परिशिष्ट" म्हणून जोडण्यात आला आहे.

वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात समितीने भेटी दिलेल्या सिंधुदुर्ग, धुळे, लातूर व अमरावती जिल्हा परिषदेच्या कामकाजांची तपासणी करीत असताना समितीला आढळून आलेल्या काही मुद्यांबाबत समितीचे अभिप्राय व शिफारशी अहवालात समाविष्ट केल्या आहेत.

सन २०१०-२०११ साठी गठित झालेल्या समितीने दिनांक २० डिसेंबर, २०११ रोजीच्या बैठकीत अहवाल विचारात घेऊन संमत केला.

विधान भवन :
नागपूर,
दिनांक : २० डिसेंबर, २०११.

बबनराव शिंदे,
समिती प्रमुख,
पंचायती राज समिती.

(अकरा)

अनुक्रमणिका

अ.क्र.	प्रकरण क्रमांक	विषय	पृष्ठ क्रमांक
(१)	(२)	(३)	(४)
		प्रकरण एक **सिंधुदुर्ग जिल्हा परिषद**	
१	१.१	पंचायत समिती देवगड पंचायत समिती कार्यक्षेत्रास मजूरांची नोदणी होऊनही मजूरांना रोजगार पत्रक (जॉब कार्ड) न मिळणे.	
		प्रकरण दोन **धुळे जिल्हा परिषद**	
२	२.१	आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांना फी माफी (उच्च शिक्षण)	
		प्रकरण तीन **लातूर जिल्हा परिषद**	
३	३.१	राज्यात दारिद्र्य रेषेखाली येणाऱ्या व्यक्तीबाबतचे निकष	
		प्रकरण चार **अमरावती जिल्हा परिषद**	
४	४.१	आदिवासी मुलींची आश्रमशाळा व वसतीगृह टेंब्रुसोंडा	
५		परिशिष्ट बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त	

जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग (प्रशासन)

१.१ पंचायत समिती देवगड पंचायत समिती कार्यक्षेत्रास मजूरांची नोदणी होऊनही मजूरांना रोजगार पत्रक (जॉब कार्ड) न मिळणे.

सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेच्या सन २००४-०५ या वर्षातील वार्षिक प्रशासन अहवालावरील प्रश्नावली क्र. २ संदर्भात दिनांक २९ जानेवारी, २००९ रोजी देवगड पंचायत समितीला दिलेल्या भेटीच्या वेळी पंचायती राज समितीने, पंचायत समिती व ग्रामपंचायतीमार्फत जवाहर रोजगार योजना व जवाहर ग्रामसमृद्धी योजनेखाली किती कामे हाती घेण्यात आली, त्यापैकी किती कामे पूर्ण झाली व किती अपुर्ण कामे आहेत, ती अपूर्ण असल्याची कारणे काय आहेत, अशी लेखी माहिती विचारली.

त्यावर गटविकास अधिकारी, देवगड पंचायत समिती यांनी सन २००४-०५ मध्ये पंचायत समिती व ग्रामपंचायतीमार्फत जवाहर रोजगार योजना व जवाहर ग्रामसमृद्धी योजनेखाली कामे घेण्यात आली नाहीत असा लेखी खुलासा केला.

समितीने देवगड पंचायत समितीस दिलेल्या भेटीच्यावेळी माहिती घेण्यासाठी, पंचायत समितीच्या कार्यक्षेत्रामध्ये रोजगार उपलब्ध होण्यासाठी मजुरांची नोंदणी करण्यात आली आहे काय, असे विचारले असता गटविकास अधिकारी यांनी समितीला, महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेखाली १८ हजार ३६ मजुरांनी तालुक्यामध्ये नोंदणी केली आहे. ही नोंदणी पाच ते सहा महिन्यापूर्वी करण्यात आली असून मजुरांची छायाचित्रे सुद्धा काढण्यात आलेली आहेत. परंतू त्यांना अजून रोजगार पत्रक (जॉब कार्ड) देण्यात आले नाही. त्यांना काम उपलब्ध करुन दिली नाही तर निर्वाह भत्ता द्यावा लागेल असा खुलासा केला.

समितीने नवीन योजनेनुसार त्यांना रोजगार पत्रक (जॉब कार्ड) देण्यास विलंब होण्याचे कारण काय, अशी विचारणा केली असता, गटविकास अधिकारी यांनी रोजगार पत्रक (जॉब कार्ड) बनविण्याचे काम महसूल विभागाने हाती घेतले असून त्यासाठी मक्तेदार नेमण्यात आला आहे.तथापि, मक्तेदाराने वर्षभरामध्ये रोजगार पत्रक (जॉब कार्ड) छापण्याचे कोणतेही काम केले नाही असे समिती पुढे स्पष्ट केले.

समितीने पुढे महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेमध्ये मजुरांची नोंदणी करण्यात आल्यानंतर त्यांना रोजगार पत्रक (जॉब कार्ड) देण्यात आले नाही ही बाब गंभीर स्वरुपाची आहे. तसेच पंचायत समितीने आपला अर्थसंकल्प तयार करीत असतांना वर्षभरामध्ये महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी

योजनेमध्ये एकही काम न घेण्याचे कारण काय, अशी पृच्छा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस कागदपत्रांची पूर्तता न झाल्यामुळे रोजगार पत्रक (जॉब काड)र् बनविण्यास विलंब होत आहे. लोकांनी ग्रामसेवकाकडे कामाची मागणी केलेली नाही, त्यामुळे मजुरांच्या मजूरीवर खर्च झालेला नाही अशी माहिती दिली.

संपूर्ण सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेवर एक रुपया खर्च करण्यात आला नाही ही बाब गंभीर आहे. रोजगार पत्रक (जॉब कार्ड) मिळण्याकरिता आपण काय प्रयत्न केले आहेत, अशी समितीकडून विचारणा करण्यात आली असता, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी याबाबत जिल्हाधिकाऱ्यांमार्फत कार्यवाही केली जाते तसेच जिल्हा परिषदेमार्फत कामाचा आराखडा तयार करण्यात आला आहे व त्यास सामान्य प्रशासन विभागाची मान्यता मिळाली आहे अशी समितीस माहिती दिली.

गटविकास अधिकाऱ्यांनी अधिक माहिती देतांना पुढे नमूद केले की, रोजगार पत्रक (जॉब कार्ड) छपाईचे काम जिल्हा परिषदेकडे नव्हते. त्याबाबत सातत्याने मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी बैठकीमध्ये हा विषय मांडून गटविकास अधिकाऱ्यांच्या पातळीवर जबाबदारी टाकण्यात आली. त्यासाठी एक महिन्यापूर्वी निवीदा काढण्यात आली आणि गटविकास अधिकारी पातळीवर पंचायत समितीचे कर्मचारी नेमून छायाचित्र काढण्याचे काम सुरु करण्यात आले. त्या अनुषंगाने दोन-तीन ग्रामपंचायतीमध्ये छायाचित्र घेण्याचे काम करण्यात आले. यामध्ये मजुरांच्या संपूर्ण कुटुंबाचे छायाचित्र घ्यावे लागते. परंतु संपूर्ण कुटुंब एकाच वेळी छायाचित्रासाठी उपलब्ध होत नसल्यामुळे रोजगार पत्रक (जॉब कार्ड) तयार करता येत नाही. त्याचप्रमाणे कामाचे अंदाजपत्रक तयार करुन त्यास प्रशासकीय मान्यता घेण्यात आली आहे. तथापि काम सुरु करण्यासाठी दानपत्र मिळत नाही आणि ६०:४० च्या प्रमाणकामध्ये काम बसत नाही. अशी अडचण असल्यामुळे ती अट शिथिल केली जात नाही. दानपत्र मिळत नसल्यामुळे रस्त्याची कामे मोठ्या प्रमाणावर होत नाहीत, त्यामुळे दानपत्राची अट शिथिल करण्याबाबत वारंवार पत्र व्यवहार करण्यात आला आहे. पंचायत समितीच्या बैठकीमध्ये सुद्धा ठराव संमत करण्यात आला आहे.

गटविकास अधिकारी यांनी समितीस पुढे असे सांगितले की, रोजगार पत्रक (जॉब कार्ड) छपाईसाठी २८ रुपये किंमत लावली जाते. मुळात ठेकेदाराला ठेका देताना प्रति कार्ड ४६ रुपये किंमत लावली गेली. जिल्हा परिषदेने देखील २८ रुपयांवरुन ४६ रुपयेपर्यंत किंमत वाढवून घेतली. त्यावर

समितीने विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी अधिकाऱ्यांबरोबर चर्चा करुन यासंपूर्ण अडचणीतून काहीतरी मार्ग काढण्यासाठी विभागीय सचिवांची साक्ष घेण्याचा निर्णय घेतला.

समितीस प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने खालील मुदयासंदर्भात अधिक माहिती मागविली.

पंचायत समिती देवगड, कार्यक्षेत्रात मजूरांची नोंदणी होवून सुध्दा त्यांच्याकडे रोजगार पत्रक (जॉब कार्ड) नसल्याने एकही काम घेण्यात आले नाही, त्यामुळे सदर योजनेअंतर्गत निधी खर्च झालेला नाही. यास कोण जबाबदार आहे तसेच सदर योजनेअंतर्गत कामे घेण्यास सिंधुदुर्ग जिल्हयात कोणत्या अडचणी आहेत, त्यांचे निवारण कशा पध्दतीने करणे आवश्यक आहे जेणेकरुन दारिद्र रेषेखालील लोकांना काम मिळेल.

उपरोक्त मुदयासंदर्भात जिल्हा परिषदेकडून खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.

पंचायत समिती देवगड कार्यक्षेत्रात एकूण १०४८७ मजूरांची नोंदणी झालेली असून यापैकी ८३९७ कुटूंबांना रोजगार पत्रक (जॉब कार्ड) वितरित केलेली आहेत. सदरची नोंद www.nrega.nic.in संकेत स्थळावर भरणेत आलेली आहे.उर्वरित कुटूंबांना रोजगार पत्रक (जॉब कार्ड) वितरित करण्याची कार्यवाही सुरु आहे व ती लवकरात लवकर पूर्ण करणेत येईल.

नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्रमांक मग्रारोहयो/२००८/जॉब कार्ड छपाई/प्र.क्र.८२ /रोहयो-९ दिनांक ३०/९/२००८ अन्वये जर गांवातील काही मजूर कामासाठी आले आणि त्यांची नोंदणी झाली नसेल, तरीही त्यांना काम द्यावे आणि एक दोन दिवसात प्राधान्याने त्यांची नोंदणी करुन घेवून त्यांना रोजगार पत्रक (जॉब कार्ड) देण्यात यावे.परंतू कोणत्याही परिस्थितीत नोंदणी व रोजगार पत्रकाविना मजूरी अदा केली जाणार नाही. याबाबत सर्व तहसिलदार व गट विकास अधिकारी यांना सुचित करण्यात आलेले आहे व अशी परिस्थिती निर्माण झाल्यास, वरीलप्रमाणे कार्यवाही करणेबाबत सुचना देणेत आलेली आहे. यामुळे मजूर नोंदणी अभावी व रोजगार पत्रक (जॉब कार्ड) अभावी काम न देण्याचा प्रश्न उद्भवत नाही, तसेच आजपर्यन्त एकाही मजूराने कामाची मागणी केली नसल्याने तसेच अद्याप काम सुरु होवू शकले नसल्याने, या योजनेअंतर्गत निधी खर्च झालेला नाही. यास प्रशासकीय स्तरावर कोणीही जबाबदार नाही.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत सिंधुदुर्ग जिल्हयात ग्रामपंचायत स्तरावर एकूण १९१ व यंत्रणा स्तरावर एकूण ०९ अशी एकुण २०० कामे शेल्फवर आहेत. मजूरांची

कामाबाबत मागणी होताच त्यांना काम पुरविण्यात येईल. परंतु आज अखेर मजूरांनी कामाची मागणी केली नसल्याने कामे सुरु करणेत आली नाहीत. मजूरांमार्फत कामाची मागणी होताच त्यांना काम पुरविण्यात येईल याबाबत संपुर्ण दक्षता घेण्यात आली आहे.

विभागीय सचिवांची साक्ष:

पंचायती राज समितीने सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेअंतर्गत देवगड पंचायत समितीस भेट देऊन घेतलेल्या माहितीच्या अनुषंगाने दिनांक १५ नोव्हेंबर, २०१० रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने पंचायत समिती कार्यक्षेत्रात मजुरांची नोंदणी होऊन सुद्धा त्यांच्याकडे रोजगार पत्रक (जॉब कार्ड) नसल्याने, महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनाचे एकही काम घेण्यात आले नाही, त्यामुळे सदर योजनेअंतर्गत निधी खर्च न झाल्याप्रकरणी कोण जबाबदार आहे अशी विचारणा केली, त्यावेळी उत्तर देताना महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत मजुरांनी कामाची मागणी करुनही त्यांना काम मिळाले नाही, अशी वस्तुस्थिती नाही. रोजगार पत्रक (जॉब कार्ड) पुरवण्याकामी एका एजन्सीला काम देण्यात आले होते परंतु या एजन्सीकडून रोजगार पत्रक (जॉब कार्ड) उपलब्ध करुन देण्याकामी विलंब झालेला आहे. रोजगार पत्रक (जॉब काड)र् मिळाले नाही म्हणून मजुरांना काम मिळाले नाही अशी वस्तुस्थिती नसून रोजगार पत्रक (जॉब कार्ड) नसले तरी नो`दणी झालेल्या मजुरांना काम उपलब्ध करुन देण्यात यावे, अशा सुचना देण्यात आल्या होत्या. परंतु मजुरांकडून कोणत्याही कामाची मागणी आली नाही. जिल्ह्यातील एकूण ५३,८०५ कुटुंबांना रोजगार पत्रके (जॉब कार्ड) वितरीत करावयाची होती, त्यापैकी ४३,७३० कुटुंबांची रोजगार पत्रक (जॉब कार्ड) शिल्लक आहेत. संबंधित एजन्सीने रोजगार पत्रक (जॉब कार्ड) पुरवठा पूर्णपणे न केल्यामुळे संबंधित एजन्सीला नोटीस दिलेली आहे. समितीने रोजगार पत्रक (जॉब कार्ड) नसले तरी नां`दणी झालेल्या मजुरांना महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेमध्ये काम उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात ग्रामविकास विभागाने शासन निर्णय निर्गमित केलेला आहे असा समितीपुढे विभागीय सचिवांनी खुलासा केला. समितीने, सदर योजनेअंतर्गत कामे घेण्यास सिंधुदुर्ग जिल्ह्यात कोणत्या अडचणी आहेत व त्यांचे निवारण कशा पद्धतीने करणे आवश्यक आहे, ज्यामुळे दारिद्र्य रेषेखालील मजुरांना काम मिळू शकेल अशी पृच्छा केली असता, विभागीय सचिवांनी, सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये इतर जिल्ह्यांसारखे मजूर उपलब्ध होत नाहीत. येथे मजूर उपलब्ध न होणे हीच खरी समस्या आहे. विदर्भ, नांदेड, भंडारा, गोंदिया या ठिकाणी मोठ्या प्रमाणात मजूर उपलब्ध होऊ शकतात, परंतु सिंधुदुर्ग जिल्ह्यात मजूर उपलब्ध होऊ शकत नाहीत. सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये महाराष्ट्र ग्रामिण रोजगार हमी योजनेची कामे नाहीत, असे नसून सिंधुदुर्ग जिल्ह्यातील बहुतांश जमीनी या खाजगी मालकीच्या असल्याने, बक्षीसपत्र वा दानपत्र घेण्यासंदर्भात अडचणी निर्माण होतात. तसेच मजुरांकडून कामाची मागणी झाल्यास शेल्फवरील ग्रामपंचायतीकडे १९२ व इतर यंत्रणेकडील १३ अशी एकूण २०५ कामे उपलब्ध करुन देण्यात येतील.

असा समितीस साक्षीच्यावेळी खुलासा केला. समितीने रोजगार पत्रक (जॉब कार्ड) पुरविण्याचे काम केव्हापर्यंत केले जाणार आहे असे विचारले असता विभागीय सचिवांनी सदर काम आठ दिवसात पूर्ण केले जाईल असे समितीस आश्वासन दिले.

अभिप्राय व शिफारशी :-

देवगड पंचायत समिती अंतर्गत महाराष्ट्र ग्रामिण योजनेअंतर्गत १८ हजार ३६ मजूरांची नोंदणी ६ महिन्यांपूर्वी होऊन त्यांची छायाचित्रे काढण्यात आली. तथापी, त्यांना रोजगार पत्रका (जॉब कार्ड) अभावी निर्वाह भत्ता देण्यात येत नव्हता, त्यामुळे रोजगार पत्रक (जॉब कार्ड) छपाईचे काम महसूल विभागाने हाती घेवून त्यासाठी ठेकेदार नेमला होता. तथापी त्याने वर्षभरात जॉब कार्ड छपाईचे कामच केलेले नव्हते.

पंचायत समितीने अर्थसंकल्प तयार करतांना याबाबत तरतुद केलेली नव्हती. कागदपत्राची पुर्तता येथील लोकांकडून न झाल्याने रोजगार पत्रक बनविण्यास विलंब होत आहे. लोकांनी ग्रामसेवकांकडे कामाची मागणी न केल्याने मजूरीवर खर्च झाला नाही. गेल्या व चालूवर्षी प्रत्येकी दोन आराखडे तयार करण्यात आले. दानपत्राची तसेच ६०:४० या प्रमाणकाची अडचण निर्माण झाली. दानपत्राची अट शिथिल करण्यासाठी पत्र व्यवहार झाला तसेच ठरावही सं ंमत झाला रोजगार पत्रक (जॉब कार्ड) ची छपाई किंमत ठेकेदारांने रु. २८ वरुन रु. ४६ पर्यन्त वाढविली. त्यास जिल्हा परिषदेने मान्यता दिली. घरातील माणसे कामानिमित्त मुंबईस गेल्याने त्यांचे एकत्रित छायाचित्रण करण्यास अडचण येत आहे.

जिल्हा परिषदेच्या लेखी माहितीत १०४८७ मजूरांची नोंदणी झाली यापैकी ८३९७ कुटूंबांना रोजगार पत्रक (जॉब-कार्ड) वितरित केल्याचे म्हटले आहे. **मजूरांअभावी नोंदणी झाली नसली तरी त्यांना काम देण्यात यावे व त्यांची नंतर नोंदणी करण्यात यावी. तथापी विना मजूरी रोजगार पत्रक (जॉब-कार्ड)वितरित करण्यात येवू नये. याबाबतचा शासन निर्णय काढण्यात आलेला आहे.** मागणी नसल्याने काम देण्यात आले नाही, त्यामुळे याप्रकरणी शासनस्तरावर कोणी दोषी असल्याचा प्रश्न उदभवत नाही, अशी समितीस लेखी माहिती देण्यात आली आहे.

देवगड पंचायत समिती अंतर्गत ग्रामपंचायतीकडे १९२ व इतर १३ अशी एकून २०५ शेल्फवरील कामे आहेत. काम उपलब्ध होणे ही खरी अडचण नसून मजूर तसेच दानपत्र न मिळणे या ख-या समस्या आहेत.

रोजगार पत्रक (जॉब-कार्ड) पुरविणा-या ठेकेदारांने रोजगार पत्रक (जॉब कार्ड) पुरविण्यास विलंब केला त्यावर काय कारवाई केली. रोजगार पत्रक (जॉब कार्ड)ची किंमत रु २८ वरुन ४६ रुपयेवर कशी गेली. तसेच दानपत्राबाबत येत असलेल्या अडचणी दूर करण्यासाठी काय कार्यवाही केली. याबाबतची माहिती समितीस त्वरीत सादर करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

जिल्हा परिषद, धुळे

२.१ आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांना फी माफी (उच्च शिक्षण)

पंचायती राज समितीने धुळे जिल्हा परिषदेच्या सन २००४-०५ या वर्षातील वार्षिक प्रशासन अहवालावरील प्रश्नावली क्र. १ बाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून, शासकीय अनुदानातून घेतलेल्या कोणकोणत्या योजनांवर उक्त वर्षात शासकीय अनुदानाची संपूर्ण रक्कम खर्च होऊ शकली नाही. त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत याबाबतची योजनानिहाय माहिती मागविली.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस, सन २००४-०५ या वित्तीय वर्षात शासकीय अनुदानापोटी आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या पालकांच्या मुलांना फी माफी (उच्च शिक्षण) यासाठी रु. २७ लाख २४ हजार एवढे अनुदान प्राप्त झाले, त्यातुन रु.११ लाख ५२ हजार एवढी रक्कम खर्च झाली आणि रु. १५ लाख ७२ हजार अखर्चित राहण्याचे कारण, पुरेसे प्रस्ताव प्राप्त नाहीत. प्राप्त प्रस्तावांपैकी काही प्रस्ताव अक्षेपित असल्याने परत केले व खर्च कमी झाला आहे, अशी लेखी माहिती दिली.

पंचायती राज समितीने दिनांक १२ फेब्रुवारी, २००९ रोजी जिल्हा परिषदेस दिलेल्या भेटीच्या वेळी, आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या पालकांच्या मुलांना फी माफी (उच्च शिक्षण) या योजनेवर खर्च कमी होण्याचे कारण पुरेसे प्रस्ताव प्राप्त नाहीत, प्राप्त प्रस्तावापैकी काही प्रस्ताव आक्षेपित असल्याने परत केले, त्यामुळे खर्च कमी झाला आहे. याचाच अर्थ शाळांच्या मुख्याध्यापकांकडून प्रस्ताव न आल्याने योजनेवरील खर्च कमी झाला आहे. ज्यांनी पुरेसे प्रस्ताव पाठविले नाहीत त्यांच्यावर आपण काय

कारवाई केली, संस्थेच्या अध्यक्षांवर काय कारवाई केली, संस्थांच्या मान्यता थांबविल्या काय, तसेच शेरे लिहीलेत काय, अशी विचारणा केली असता, त्याचे उत्तर समितीस प्राप्त झाले नाही.

समितीने भेटीच्या वेळी विचारलेल्या प्रश्नाचे देखील शिक्षणाधिकारी उत्तर देऊ शकले नाहीत. माहिती पुस्तिकेमध्ये नमूद केले आहे की, आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या पालकांच्या मुलांचे फी माफी योजनेसाठी पुरेसे प्रस्ताव आले नाहीत. या योजनेवर जेवढा निधी खर्च व्हावयास हवा होता, तेवढा निधी पुरेशा प्रस्तावांअभावी खर्च होऊ शकला नाही, त्यामुळे ज्यांनी प्रस्ताव पाठविले नाहीत त्यांच्यावर जिल्हा परिषदेने काय कारवाई केली, जिल्हा परिषदेकडे आलेल्या प्रस्तावांपैकी काही प्रस्ताव आक्षेपित असल्यामुळे, ते संबंधित शाळांकडे परत पाठविले. असे किती प्रस्ताव व त्यांच्या प्रस्तावात ज्या त्रुटी होत्या त्यांची पूर्तता करुन ते प्रस्ताव फेरसादर करण्यासाठी आपण शाळांकडे काय प्रयत्न केले, शाळांकडून पुरेसे प्रस्ताव न आल्याने, प्रस्तावातील त्रुटी दूर करण्यासाठी प्रस्ताव परत पाठविल्याने आणि शाळांनी फेरप्रस्ताव सादर न केल्यामुळे किती लाभार्थी या योजनेपासून वंचित राहिले असे पुढे समितीने वेळी विचारले असता शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी अहवाल वर्षात शाळा-कॉलेजकडून जे प्रस्ताव आले होते त्यामध्ये त्रुटी होत्या. त्या त्रुटींची पुर्तता करण्यासाठी संबंधित शाळा-कॉलेजकडे ते परत पाठविले होते. परंतु त्यांनी त्रुटींची पुर्तता करुन प्रस्ताव जिल्हा परिषदेस पाठविले नाहीत, असा समितीस खुलासा केला.

त्यावर पुनः ज्यांनी प्रस्तावांतील त्रुटींची पुर्तता करुन प्रस्ताव परत पाठविले नाहीत, त्यांच्यावर शिक्षणाधिकारी या नात्याने आपण काय कारवाई केली. यास्तव शाळा-कॉलेजकडून प्रस्ताव न आल्यामुळे शिक्षणाधिका-यांनी त्यांच्याशी संपर्क साधने आवश्यक होते. प्रस्तावात त्रुटी काढून ते प्रस्ताव आपण संबंधित शाळा-कॉलेजेसना पाठवून दिले, परंतु त्या त्रुटींची पुर्तता करुन त्यांनी प्रस्ताव फेर सादर करण्यासाठी आपण काय प्रयत्न केले असे समितीने विचारले असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी, पुरेसे प्रस्ताव प्राप्त का झाले नाही, याबाबत शिक्षणाधिकाऱ्याकंडे विचारणा केली होती. जे प्रस्ताव प्राप्त झाले होते त्यातील काही प्रस्तावांत त्रुटी असल्यामुळे संबंधित शाळा-महाविद्यालयांकडे ते त्रुटींची पुर्तता करण्यासाठी पाठविले होते. परंतु तरी सुद्धा यासंदर्भात सविस्तर माहिती घेतो असा त्यांनी भेटीच्या वेळी समिती पुढे खुलासा केला.

समितीने, ही योजना मागासलेल्या व गरीब विद्यार्थ्यांसाठी असून ज्यांची आर्थिक परिस्थिती हलाखीची असते त्यांना या योजनेचा एकप्रकारे आधार असतो, परंतु अधिकाऱ्यांनी त्या विद्यार्थ्यांना या

योजनेचा लाभ दिला नाही. त्यांना एकप्रकारे या योजनेपासून वंचित ठेवले. असा निष्कर्ष काढला समितीने, मागासलेल्या विद्यार्थ्यांसाठी असलेली फी माफीची योजना राबविण्यात किंवा अन्य योजना राबविण्यात अधिकारी टाळाटाळ करीत असतील तर आपण त्यांना पाठीशी न घालता त्यांच्यावर कारवाई करावयास पाहिजे व गरीब विद्यार्थ्यांसाठी ज्या योजना आहेत त्या योजनांचा पैसा प्रत्यक्ष त्या मुलांच्या हातात मिळण्याबाबतचा निर्णय मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी आजच्या बैठकीत घेण आवश्यक होते असे मत प्रतिपादन केले. विद्यार्थ्यांना जर वेळेवर फी दिली तर त्याचा एकप्रकारे त्यांना फायदाच होईल. निरनिराळ्या योजनेंतर्गत देण्यात येणारी रक्कम संस्थाचालक प्रत्यक्षात त्या विद्यार्थ्यांना देतात काय, याबाबतचा आढावा मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी घ्यावा, अशी सुचना केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या प्रकरणाची सविस्तर माहिती मागविलेली आहे. पुढे कोणताही विद्यार्थी फी माफी योजनेपासून वंचित राहणार नाही याबाबत काळजी घेण्यात येईल असे समितीस आश्वासन दिले. समितीने पुढे जिल्हा परिषदेला एक महिन्यापूर्वी प्रश्नावली पाठविली होती, तरी सुद्धा अधिकारी त्या प्रश्नावलीच्या अनुषंगाने विचारण्यात येत असलेल्या प्रश्नांना समाधानकारक उत्तरे न देता गोलमाल उत्तरे देऊन वेळ मारुन नेत आहेत, अशी खंत व्यक्त करुन यापुढे अधिकाऱ्यांना जो काही प्रश्न विचारण्यात येईल त्या प्रश्नालाच त्यांनी नेमके उत्तर द्यावयास पाहिजे.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अधिकाऱ्यांना पाठीशी घालता कामा नये. या ठिकाणी शिक्षणाधिकाऱ्यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांना फी माफीची १०० टक्के रक्कम देऊ आणि मुख्य कार्यकारी अधिकारी सांगत आहेत की, या वर्षी फी माफीची रक्कम खर्च केली आहे. शिक्षणाधिकाऱ्यांनी दिलेले उत्तर आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिलेले उत्तर यामध्ये तफावत आहे. एकाच प्रश्नाचे उत्तर जर दोन जबाबदार अधिकारी वेगवेगळे देत असतील तर कार्यवृत्तामध्ये कोणते उत्तर समाविष्ट करावे असा समितीस प्रश्न पडेल समितीने पुढे प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी राबवावयाच्या फी माफी योजनेबाबत सुद्धा तीच स्थिती आहे. या योजनेसाठी प्राप्त अनुदान ६,१०,०००/- होते, त्यापैकी ५,६६,०००/- रुपये खर्च झाला असून ४४,०००/- रुपये शिल्लक राहिले आहेत. माजी सैनिकांच्या मुलांना शैक्षणिक सवलतीच्या योजनेसाठी ४६,०००/- रुपये प्राप्त अनुदान होते, त्यापैकी २९,०००/- रुपये प्राप्त झाले व १६,०००/- रुपये शिल्लक राहिले आहेत. असे सांगुन या तिन्ही योजनांवरील खर्च कमी होण्यास एकच कारण दिले आहे. तसेच शाळांकडून फेरप्रस्ताव प्राप्त करण्यासाठी काय प्रयत्न केले अशी समितीने पृच्छा केली परंतु त्याचे समितीस उत्तर प्राप्त झाले नाही.

जिल्हा परिषदेस दोन महिन्यापूर्वी प्रश्नावली देण्यात आली होती, त्या संदर्भात तीने अभ्यास करणे अपेक्षित होते. मागील काळातील माहिती मिळत नाही. म्हणून अदयावत माहिती विचारली असता, त्याचेही उत्तर मिळत नाही, विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित ठेवण्याचा प्रयत्न या जिल्हा परिषदेने केला आहे. या विषयाच्या संदर्भात विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात येईल असे भेटीच्या वेळी सांगितले.

भेटीच्या **वेळी घेतलेल्या माहितीच्या आधारे अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने विभागाकडून खालील मुद्याबाबतची माहिती मागविली.**

आर्थिकदृष्ट्या मागसलेल्या विद्यार्थ्यांना फी माफी संदर्भात राज्य शासनाकडे वेळीच प्रस्ताव न पाठविल्याने संबंधित विद्यार्थ्यांना सदर सवलतीचा लाभ मिळाला नाही या प्रकरणी जबाबदार अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली आहे? अद्याप कारवाई केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

धुळे जिल्हा परिषदेकडून समितीस वरील मुद्यांच्या अनुषंगाने खालील माहिती प्राप्त झाली.

शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य पुणे-१ यांचे दि.३१/३/२००५ च्या आदेशान्वये लेखाशिर्ष २२०२१४५६ अंतर्गत उच्चशिक्षणासाठी अंतिम अनुदान (ज्यांचे / ज्यांच्या पालकांचे उत्पन्न रु. १५,०००/- पेक्षा अधिक नाही. अशा विद्यार्थ्यांना शैक्षणिक सवलती (अथिर्क दृष्टया मागासलेल्या योजने अंतर्गत) समायोजनाने सन २००४-०५ करिता मूळ तरतूद रु.२८,००,०००/- मंजूर असून धुळे जिल्ह्याकरिता सन २००४-०५ या आर्थिक वर्षाकरिता मुक्त केलेले अनुदान विवरण पत्र क्र.१ (अथिर्क दृष्टया मागासलेल्या) मध्ये रु.२७,२४,०००/- इतके होते.

प्राप्त तरतुदीमधून सन २००२-२००३ व सन २००३-२००४ या आर्थिक वर्षातील प्रलंबित देयके रक्कम रु. ४,१२,८५७/- व सन २००४-०५ या आर्थिक वर्षात प्राप्त देयके रु. ६,२२,९३८/- असे एकूण रु १०,३५,७९५/- अनुदानाचे तालुकानिहाय खालीलप्रमाणे करण्यात आले आहे.

अ.क्र.	तालुका	रक्कम (रुपये)
१.	धुळे	३,९१,९२६/-
२.	साक्री	१,०३,५०९/-

३.	शिंदखेडा	६३,१०३/-
४.	शिरपुर	६४,४००/-
५.	धुळे शहर	४,१२,८५७/-
	एकूण	**१०,३५,७९५/-**

तसेच जिल्ह्यातील उच्च महाविद्यालयांचे प्रस्ताव नंतर प्राप्त झाल्याने लाभार्थींना रक्कम रु. १,१६,२७५/- वितरीत करणेत आली आहे.

आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांसाठी मुख्याध्यापकांच्या आढावा बैठकीत मागणी संदर्भात वेळोवेळी सुचना देऊन प्रस्ताव मागविण्यात येतात. उपलब्ध तरतुदीमधून सन २००२-०३, २००३-०४ व २००४-०५ या आर्थिक वर्षात या कार्यालयांकडे प्राप्त असलेल्या परिपूर्ण सर्व प्रस्तावांचा अंतर्भाव देयकात करणेत येऊन लाभार्थींना अनुदानाचे वितरण करण्यात आलेले आहे.

प्राप्त सर्व परिपूर्ण प्रस्तावानूसार वितरणाची कार्यवाही झालेली आहे. एकूण अनुदानापैकी रु.११.५२ लक्ष रक्कम खर्च करणेत आली असून शिल्लक अनुदानाची रक्कम रु. १५.७२ लक्ष शासनाकडे समर्पित करण्यात आलेली आहे. कार्यालयाकडील सर्व परिपूर्ण प्रस्तावावर कार्यवाही करण्यात येऊन लाभार्थ्यांना लाभ देण्यात आलेला आहे. त्यामुळे अधिकारी यांचेवर कारवाई करण्यात आलेली नाही.

विभागीय सचिवांची साक्ष :-

धुळे जिल्हा परिषदेस दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने मंत्रालयीन सचिवांची दिनांक १५ नोव्हेंबर, २०१० रोजी पंचायत राज समितीने साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांना फी माफी संदर्भात राज्य शासनाकडे वेळीच प्रस्ताव न पाठविल्याने, संबंधित विद्यार्थ्यांना सदर सवलतीचा लाभ मिळाला नाही या प्रकरणी जबाबदार अधिकाऱ्यावर कोणती कारवाई केली आहे, अद्याप कारवाई केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत, अशी समितीने विचारणा केली असता, ही सवलत मिळण्यासाठी शाळा अर्ज भरुन घेतात आणि त्यानंतर दावा करतात. शाळां कडून जर प्रस्ताव वेळेवर आले नाहीत तर शासनाकडून प्रतिपुर्ती करण्यास उशीर होतो. सन २००२-०३, सन २००३-०४ आणि सन २००४-०५ या तीन वर्षातील १० लाख ३५ हजार रुपयांची प्रतिपुर्ती केलेली आहे, त्याचप्रमाणे उच्च महाविद्यालयाच्या १ लाख १६ हजार

२७४ रुपयाची प्रतिपुर्ती देखील केली आहे सन २००४-०५ सालासाठी २७ लाख २४ हजार रुपये उपलब्ध करुन दिले आहेत. एकूण अनुदानापैकी ११.५२ लाख रुपये खर्च झालेले आहेत आणि १५.७२ लाख रुपये शासनाला समर्पित केले आहेत. शाळांकडून वेळेवर प्रस्ताव येणे महत्वाचे असून त्यासाठी यापूर्वीच सूचना देण्यात आल्या होत्या आता पुन्हा सुचना देण्यात आल्यामुळे वेळेवर प्रस्ताव येत्ील असा खुलासा विभागीय सचिवांनी साक्षीच्या वेळी समितीसमोर केला त्यावर समितीने, या सुविधांपासून कोणीही वंचित राहता कामा नये असे मत मांडले असता, विभागीय सचिवांनी समितीस संगणकीकरण करून हे काम लवकर कसे करता येईल या दृष्टीने प्रयत्न करण्यात येतील, असे आश्वासन दिल्यानंतर समितीने, शेवटी सगळ्याच ठिकाणी असा प्रयत्न करण्यात यावा आणि वेळेवर ही रक्कम कशी मिळेल हे आपण पहावे अशी सुचना केली आणि ती विभागीय सचिवांनी मान्य केली.

अभिप्राय व शिफारशी:-

सन २००४-२००५ या वित्तीय वर्षात धुळे जिल्हा परिषदेने आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांसाठी प्राप्त अनुदानापैकी निम्म्यापेक्षा जास्त म्हणजेच रुपये २७ लाख २४ हजार एवढया अनुदानातून रुपये १५ लाख ७२ हजार एवढी रक्कम अखर्चित ठेवली होती.

पंचायती राज समितीने दिलेल्या भेटीच्या वेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, तसेच शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्याकडून याबाबत घेतलेल्या माहितीत शाळा व कॉलेजांकडून पुरेसे प्रस्ताव प्राप्त झाले नाहीत व प्राप्त प्रस्तावात त्रुटी आढळून आलेल्या होत्या. यास्तव शाळेचे मुख्याद्यापक व महाविद्यालयाचे प्राचार्य व विश्वस्त यांच्याकडून जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने कोणतेही प्रयत्न वा पाठपुरावा केल्याचे आढळून आले नाही. तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी व शिक्षणाधिकारी (मा.) यांनी दिलेल्या माहितीत तफावत आढळून आली होती.

सदर योजना गोरगरीबांच्या मुलांसाठी असल्यामुळे हा एकप्रकारे गोरगरिबांचा प्रश्न आहे. अहवाल वर्षात प्रस्तावातील त्रुटींचे निराकरण करुन ते प्राप्त करुन घेण्यासाठी जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने कसल्याही प्रकारचा पाठपुरावा किंवा प्रयत्न न केल्यामुळे, बहुतांश विद्यार्थी या योजनेपासून वंचित राहिले. आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या पालकांच्या मुलांना फी माफी योजनेपासून वंचित ठेवल्यामुळे शिक्षणाधिकारी (मा.) यांना कारणे दाखवा नोटीस द्यावी असे आदेश दिले. प्रत्यक्षात मागासलेल्या विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ देण्यासाठी शिक्षणाधिकाऱ्यांनी शाळांकडून प्रस्ताव प्राप्त करून घेण्याबाबत

प्रयत्न करणे आवश्यक होते. परंतु त्यांनी कसल्याही प्रकारे प्रयत्न केल्याचे दिसत नाही, असे मत समितीने भेटीच्या वेळी व्यक्त केले,

सदर त्रुटीयुक्त प्रस्तावामधील त्रुटीची पुर्तता करुन ते पुन्हा सादर करणे आवश्यक होते, असे समितीचे मत झाले आहे.

याप्रकरणी **दोषी असलेल्या शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात यावी तसेच प्रस्तावातील त्रुटी दूर करण्यात याव्यात व अप्राप्त प्रस्ताव प्राप्त करुन घेण्यात यावेत व प्रत्येक मागासवर्गीय विद्यार्थ्यास फी माफी वेळेवर मिळेल यासाठी आवश्यक असलेली कार्यवाही सर्व संबंधितांनी वेळीच करावी यासाठी शासनाने सविस्तर सूचना यानिमित्ताने सर्व जिल्हा परिषदांना परिपत्रकाद्वारे द्यावात व सदर प्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस दोन महिन्याच्या आत कळविण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

जिल्हा परिषद, लातूर

३.१ राज्यात दारिद्र्य रेषेखाली येणाऱ्या व्यक्तीबाबतचे निकष :-

सन २००४-२००५ च्या वार्षिक प्रशासन अहवालावरील तयार करण्यात आलेल्या प्रश्नावली क्रमांक १ बाबत माहिती घेण्यासाठी पंचायती राज समितीने दिलेल्या भेटीच्या दरम्यान दिनांक ३ जुलै, २००९ रोजी खालील प्रमाणे माहिती समितीस प्राप्त झाली.

भेटीच्या वेळी समितीस स्वर्ण जयंती ग्राम स्वयंरोजगार योजनेअंतर्गत ग्रामीण भागात गरीब लोकांसाठी मोठ्या प्रमाणात लघुउद्योग उभारणे, स्वयंसहाय्य बचत गटाची स्थापना करणे, स्वयंरोजगारी कुटंुबांना व्यक्तिगत अथवा गटांच्या माध्यमातून मदत करणे, दारिद्र्यरेषेखालील कुटंुबांना स्वर्ण जयंती ग्रामस्वयंरोजगार योजनेद्वारे दारिद्र्यरेषेच्या वर आणणे, या योजनेंतर्गत स्वयंरोजगारींसाठी लघुउद्योगाच्या

उभारणीतून स्वयंरोजगार निर्माण करणे, सर्वांगीण विकासासाठी स्वयंसहाय्य बचत गटाची स्थापना करणे, उद्योग निर्माण करण्याची क्षमता निर्माण करणे, कर्ज व बाजारपेठ उपलब्ध करुन देणे, कौशल्यवृद्धीसाठी प्रशिक्षण देणे, मुलभूत सुविधा निर्माण करणे अशी माहिती प्राप्त झाली.

समितीस भेटीच्या वेळी प्राप्त उपरोक्त माहितीच्या अनुषंगाने अधिक माहिती घेण्यासाठी समितीने, दारिद्र्यरेषेची व्याख्या काय आहे, तीचे निकष काय आहेत व विदर्भात आणि पश्चिम महाराष्ट्रात निकष वेगळे आहेत काय, अशी पृच्छा केली असता, सन २००२ मध्ये सर्वेक्षण करण्यात आले, त्यानुसार दारिद्र्यरेषेखालील व्यक्तींचे पूर्वीचे निकष बदलून एकूण १३ निकष ठरविण्यात आले. प्रत्येक निकषाला ० ते ४ असे गुण देण्यात आले आहेत. सदर निकष वेगवेगळ्या प्रकारचे होते. त्यामध्ये घराची परिस्थीती कशी आहे, कुटंुबातील सदस्यांचे शिक्षण, गाडी आहे काय, जमिन किती आहे या सर्व बाबी पाहिल्या जातात व त्यानुसार गुणदान करण्याची पद्धत आहे. जर ० गुण असेल तर अतिशय वाईट परिस्थिती व जसे जसे गुण वाढत जातील त्याप्रमाणे त्याची परिस्थिती सुधारीत असल्याचे गृहीत धरले जाते. त्यामध्ये ० ते ५२ अशाप्रकारे गुण असतात.

लातूर जिल्ह्यात एकूण ३,३८,००० कुटंुबे रहात आहेत, त्यापैकी ९८,१३६ कुटंुबे दारिद्र्यरेषेखाली आहेत. आता दारिद्र्यरेषेखाली असलेल्या कुटंुबांची यादी जाहीर झालेली आहे. एकूण ५२ गुणांच्या अनुषंगाने असे ठरविले आहे की, एखाद्या गावात १०० कुटंुबे दारिद्र्यरेषेखालील असतील तर गुणांनुसार पहिल्या २९ कुटंुबांना ती दारिद्र्यरेषेखालील कुटंुबे आहेत असे संबोधले जावे. सदर निकषानुसार काही गावांत ४५ गुण मिळालेल्या काही व्यक्ती दारिद्र्यरेषेखाली येऊ शकतात तसेच १० गुण मिळालेल्या व्यक्ती दारिद्र्यरेषेवर जाऊ शकतात. थोडक्यात एका ठिकाणी सधन कुटंुब दारिद्र्यरेषेखाली जाऊ शकते आणि गरीब असलेले कुटंुब दारिद्र्यरेषेवर जाऊ शकते. या जिल्हा परिषदेस देखील त्याचप्रमाणे यादी जाहीर करण्याबाबत सांगितले आहे आणि ही एक **रिलिज कन्सेप्ट** आहे अशी समितीस माहिती प्राप्त झाली.

दारिद्र्यरेषेखाली असणाऱ्या कुटंुबासाठी असणाऱ्या बऱ्याचशा योजना या लोकसंख्येवर अवलंबून असतात. त्यामध्ये, विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, इंदिरा आवास योजना, राजीव गांधी योजना इत्यादी योजना आहेत, मानव विकास मिशनच्या योजनांना जेवढा पैसा द्यायला पाहिजे तेवढा दिला जात नाही. दारिद्र्य रेषेसंदर्भात जे काही निकष किंवा गुणदान पद्धती सांगितली त्यामध्ये बदल झाला पाहिजे, कारण त्यामुळे एखादे श्रीमंत असणारे कुटंुब देखील दारिद्र्यरेषेखाली येऊ शकते. या निकषांमुळे विदर्भातील

परिस्थिती वेगळी राहते आणि पश्चिम महाराष्ट्रातील परिस्थिती वेगळी राहते. कोकणामध्ये काय स्थिती आहे व तेथे दारिद्र्यरेषेखालील कुटंुबाची व्याख्या कशी आहे अशी, समितीने पुढे विचारणा केली असता, प्रत्येक ठिकाणी वेगवेगळ्या गावांना वेगवेगळे निकष राहतात. प्रत्येक जिल्ह्याला ध्येय दिले होते. ही सर्व पद्धत थिअरी पॉलिसीवर u आधारित आहे, असे समितीस सांगण्यात आले. त्यावर समितीने या संदर्भात अनेक लोकांनी अपील केले आहे. राज्यात सर्वांना सारखेच निकष असावेत. राज्यामध्ये जन्मलेले लोक मग ते विदर्भातील असोत वा पश्चिम महाराष्ट्रातील, राज्य शासनाचे निकष सर्वांसाठी सारखे असले पाहिजेत. या संदर्भात विभागीय सचिवांना साक्षीसाठी बोलावून या गोष्टी निकाली काढून राज्यातील दारिद्रयरेषेखालील लोकांना न्याय देता येईल असे समितीने मत व्यक्त केले.

समितीने **लातूर जिल्हा परिषदेस दिलेल्या भेटीच्या वेळी घेतलेल्या माहितीच्या अनुषंगाने दिनांक ८ फेब्रुवारी, २०११ रोजी मंत्रालयीन विभागीय सचिवांची साक्ष आयोजित केली. साक्षीच्या वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांनी समितीस भेटीच्या वेळी विचारलेल्या प्रश्नांची खालील लेखी माहिती पुरविली.**

१) समितीने राज्यात दारिद्र्यरेषेखाली येणाऱ्या व्यक्ती बाबतचे निकष व गुणदान पद्धत काय आहे, २) सदर निकष राज्यातील सर्व भागास लागू आहेत काय, दारिद्र्यरेषेबाबतच्या प्रचलित निकष व गुणदानामुळे एखादे श्रीमंत कुटंुबेदेखील दारिद्र्यरेषेखाली येते, त्यामुळे निकष राज्यभर सर्वत्र सारखेच ठेवणे व त्यातील त्रुटी दूर करण्यासंदर्भात शासनाचे धोरण काय आहे, ३) नसल्यास त्यामागचंी कारणे काय आहेत

राज्यात शासनाच्या मार्गदर्शक सुचनेनूसार कुटंुब पत्रकातील उदा. कुटंुबाचे सरासरी उत्पन्न, घराचा प्रकार, जमीन धारणेचा प्रकार इ. १ ते १३ निकषांप्रमाणे कुटंुब सर्वेक्षण करण्यात आले होते. लातूर जिल्ह्यातील एकूण ३,२९,२०६/- कुटंुबांपैकी राज्यांनी ठरवून दिलेली २९.८१% कुटंुबे दारिद्र्यरेषेखाली घेणेबाबत निर्देश दिल्यानूसार, ९८,१३६/- कुटंुबे दारिद्र्यरेषेखाली समाविष्ट झालेली आहेत.

सर्वात कमी गुण प्राप्त झालेली कुटंुबे दारिद्र्यरेषेखाली समाविष्ट करण्यात आलेली आहेत. तालुका व गाव पातळीवर सुद्धा एकूण कुटंुबाच्या २९.८१% कुटंुबे दारिद्र्यरेषेखाली घेणे बंधनकारक होते.

शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनूसार सदर निकष राज्यातील सर्व भागास लागू आहेत. शासन परिपत्रक दिनांक २२ फेब्रुवारी, २०१० व दिनांक २५ मार्च, २०१० रोजीच्या मार्गदर्शक सूचानानुसार दारिद्र्यरेषेखालील कुटंुबातील अपात्र व्यक्तींची नावे यादीतून वगळण्याबाबत कार्यवाही चालू असून जिल्ह्यामध्ये एकूण ८१७ अपात्र लाभार्थींची नावे वगळण्यात आलेली आहेत.

विभागीय सचिवांची साक्ष :-

पंचायती राज समितीने दिनांक ८ फेब्रुवारी, २०११ रोजी मंत्रालयीन विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी राज्यात दारिद्र्यरेषेखाली येणाऱ्या व्यक्तींबाबतचे निकष व गुणदान पद्धत या संदर्भात समितीने विचारलेल्या प्रश्नावर विभागीय सचिवांनी, सन २००२ मध्ये राज्यातील कुटंुबांचे दारिद्र्यरेषेबाबत सर्वेक्षण केले होते, ते उत्पन्नाच्या आधारावर नव्हते. त्यापूर्वी केलेल्या सर्वेक्षणामध्ये रु.२० हजार पेक्षा कमी उत्पन्न असेल तरच त्या कुटंुबाला दारिद्र्यरेषेखाली घ्यायचे असा निकष होता. नंतर सन २००२ मध्ये केंद्र सरकारने नियोजन आयोगाची स्थापना केली, त्यामध्ये सर्वसाधारण राहणीमानावरील दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती यास पात्र ठरतील असे ठरविण्यात आले व तत्संदर्भात, १३ निकष लावण्यात आले. प्रत्येक निकषाला ० ते ४ चे गुणांक देण्यात आले. या गुणांकात कसणाऱ्या जमिनीचे क्षेत्र, त्यात १ हेक्टरपेक्षा कमी जिरायत जमीन, दुसऱ्या गुणांकामध्ये १ ते २ हेक्टर जिरायत जमीन, तिसऱ्या गुणांकामध्ये २ ते ५ हेक्टर जिरायत जमीन, चौथ्या गुणांकामध्ये ५ हेक्टरपेक्षा अधिक जिरायत जमीन असे वर्गीकरण करण्यात आले. या १३ निकषांमध्ये कसणाऱ्या जमिनीचे क्षेत्र, घराचा प्रकार, सरासरी कपडे परिधान उपलब्धता अन्न, सुरक्षा व स्वच्छता अशा प्रकारे बाबी देण्यात आलेल्या आहेत. दारिद्र्यरेषेखालील व्यक्तींच्या गणनेमध्ये या सर्व निकषांचा विचार करुन गुण दिले जातात. नियोजन आयोग या राज्यामध्ये स्वतंत्र नॅशनल सॅम्पल सर्वे करीत असतो. त्याद्वारे दारिद्र्यरेषेखालील व्यक्तींचे जिल्हावार प्रमाण किती आहे, हे पाहिले जाते. राज्यातील दारिद्र्यरेषेखालील व्यक्तींचे सरासरी प्रमाण ३५% आहे. राज्यातील सर्व जिल्ह्यांचा विचार केला तर सातारा जिल्ह्यात सर्वात कमी दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती आहेत त्यांचे प्रमाण १२% आहे. तर सगळयात जास्त दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती नंदुरबार जिल्ह्यात असून ते प्रमाण ७१% आहे. राज्यातील प्रत्येक जिल्ह्याला केंद्र शासनाच्या आदेशाप्रमाणे कट ऑफ कळविल्या आहे. निकषांनुसार कुटंुबांची संख्या काढून कट ऑफ लावला जातो. प्रत्येक जिल्ह्याचा कट ऑफ वेगवेगळा आहे, असा खुलासा केला.

जिल्हा परिषदेने वर्तमानपत्रामध्ये जाहिरात दिली होती की, ज्यांचे उत्पन्न जास्त आहे किंवा ज्यांचे नाव चुकीने घातले आहे, त्यांनी स्वतःचे नाव काढून घ्यावे व तसे न करणाऱ्यांवर फौजदारी कारवाई केली जाईल. परंतु त्यानंतर कारवाईच झाली नाही. काही जणांनी स्वतःहून नावे काढून घेतली होती परंतु, अजूनसुद्धा त्यामध्ये बऱ्याच जणांची नावे अद्याप कमी केलेली नाहीत, याबाबत समितीने खुलासा मागितला असता, लातूर जिल्ह्यामध्ये ज्यांनी त्यांची नावे चुकुन घातली आहेत ती नावे त्यांनी काढून घ्यावीत अशी जाहिरात दिली होती, त्यानुसार काहींनी आपली नावे काढून घेतली, ज्यांची नावे चुकुन आलेली आहेत ती त्यांनी येत्या ८ दिवसात मागे घ्यावीत अन्यथा त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येतील अशी नोटीस पुन्हा देण्यात आली असे विभागीय सचिवांनी साक्षीच्या वेळी समितीस सांगितले.

पहिल्या जाहिरातीच्या प्रतिसादाअंती वगळलेली कुटुंबसंख्या १५१ तर दुसऱ्या जाहिरातीच्या प्रतिसादाअंती कुटुंब संख्या ६६६ अशी, एकूण वगळलेली कुटुंब संख्या ८१७ होती. ५२ कुटुंबांवर फौजदारी गुन्हे दाखल केले आहेत. ज्यांनी जाहिरात देऊनही प्रतिसाद दिला नाही त्यांच्यावर फौजदारी कारवाई सुरु केली आहे त्यासाठी कारवाई पथक तयार केली आहेत. रॅन्डम सॅम्पलिंग करुन लातूर जिल्ह्यात ३१ फौजदारी दावे दाखल केलेले आहेत.

समितीने पुढे, ही सगळी प्रक्रिया राज्यभर चालू आहे. या विषयीची तांत्रिक माहिती विभाग प्रतिनिधी किंवा शासन म्हणून आपल्याकडे उपलब्ध असेल. तलाठी आणि पटवाऱ्याकडून तपासून पाहिलेल्या माहितीनुसार काही खोटे अर्जदार किंवा दारिद्र्यरेषेखालील लोकांची नावे यादीतून वगळणे शासन यंत्रणेचे कर्तव्य नव्हते काय, राज्यभरातून जर खोटी नावे यादीमध्ये समाविष्ट केली जात असतील तर अर्जदारांच्या तोंडी सांगण्यावर शासकीय यंत्रणेने कितपत विश्वास ठेवणे संयुक्तिक आहे अशी पृच्छा केली असता, विभागीय सचिवांनी अशी माहिती दिली की, यादीमध्ये चुकीची माहिती देऊन आपले नाव दारिद्र्यरेषेखालील लोकांच्या यादीमध्ये समाविष्ट करण्याचा प्रयत्न बऱ्याच जणांनी केल्याचे मान्य केले. परंतु त्यावेळेस केंद्रशासनाचे लोकांनी दिलेल्या माहितीवर विश्वास ठेवा अशा प्रकराच्या स्पष्ट सूचनाच होत्या. दारिद्र्यरेषेखालील लोकांच्यायाद्या या शासनाने अंतिम केलेल्या नसून, त्या गावामधील ग्रामसभेमध्ये ठराव मांडून अंतिम केलेल्या आहेत.

काही लोकांनी तोंडी खोटी माहिती सांगितल्यामुळे त्यांचे गुण कमी झाले व त्यांना दारिद्र्यरेषेखालील यादीमधील घटकांचा फायदा मिळाला परंतु ज्यावेळी तलाठी किंवा तहसिलदाराकडून

यादीमध्ये नाव असणाऱ्या घटकांच्या जमिनीबाबत खरी माहिती उघड झाल्यानंतर त्यांच्यावर कारवाई करुन त्यांचे नाव यादीतून वगळण्याच्या कार्यवाहीस विलंब होताना दिसतो, याबाबत समितीने स्पष्टीकरण मागितले, त्यावेळी विभागीय सचिवांनी नॅशनल सॅम्पल सर्वे प्रमाणे राज्यामध्ये एकूण ४५ लाखापेक्षा जास्त कुटंुबे दारिद्र्यरेषेखाली राहू शकत नाहीत, त्यामुळे दारिद्र्यरेषेखालील घटकाचा लाभ मिळण्याकरिता महाराष्ट्रामध्ये ४५ लाख कुटंुबे एवढेच प्रमाण केंद्रशासनाने निश्चित केलेले आहे. यातून वगळलेली नावे व तलाठी, तहसिलदार यांच्याकडून सत्य माहिती उघड झाल्यानंतर वगळावयाची नावे जमेस धरुन ही संख्या कमी होती. परंतु काही काही ठिकाणी अनावधानाने व चुकीने प्रत्यक्षात दारिद्र्यरेषेखालील असलेल्या कुटंुबाचा यादीमध्ये समावेश करण्याचे राहुन गेलेले आहे. ते काम अत्यंत चांगल्या पद्धतीने राज्यभर ग्राम पाळीवर सुरु आहे, असा समितीपुढे साक्ष देताना खुलासा केला.

दारिद्र्यरेषेखालील लोकांची यादी कोणकोणत्या विभागांच्या माध्यमातून शासकीय योजनांच्या संदर्भात वापरली जाते. तसेच, या यादीमध्ये नावे असलेल्या लोकांच्या अस्तित्वात असलेल्या मालमत्तेची सत्य माहिती त्यांनी सादर केलेल्या दस्ताऐवजांमध्ये असतेच असे नाही. यादीमध्ये खोटी नावे असून जर ही कुटंुबसंख्या ४५ लाख किंवा त्यापेक्षा जास्त होत असेल तर ही यादी तपासण्याची आवश्यकता आहे. समितीने प्रतिपादन केले, त्यावर विभागीय सचिवांनी खुलासा केला की, दारिद्र्यरेषेखालील कुटंुबांची यादी तयार करताना ग्रामसभेतील ठराव व चावडी वाचनाचा आधार घेतला जातो. यामध्ये जर एखाद्या दारिद्र्यरेषेखालील प्रमाणपत्र धारकांकडे इतर दारिद्र्यरेषेखालील प्रमाणपत्र धारकांकडे थोडीशी जास्त जमिन किंवा दुसरी थोडीशी मालमत्ता असेल तर त्याचे गुण वाढतात, त्याचे ० ते ४ मधील गुणांक वाढतो मग वाढीव गुण असलेल्या द्रारिद्र्यरेषेखालील प्रमाणपत्र धारकांचे नाव प्राधान्याने खाली सरकते. कमीत कमी गुणांक व कमीत कमी गुण असलेल्या प्रमाणपत्रधारकाचे नाव प्राधान्याने वर सरकून त्याला यादीचे लाभ मिळतात.

समितीने पुढे यापूर्वी सन १९९७ च्या यादीमध्ये आणि आताच्या अद्ययावत यादीमध्ये फारसा फरक नाही, असे मत व्यक्त केले त्यावर विभागीय सचिवांनी, यादी तयार करताना भविष्यात स्वयंचलित वजावट पद्धती वापरण्यात येणार आहे. विधवा, परितक्त्या, भुमिहीन, अल्प उत्पन्न गट या वर्गामध्ये मोडणाऱ्या नागरिकांचाही प्राधान्यक्रम लावण्यात येवून द्रारिद्र्यरेषेखालील यादी बनविण्यात येणार आहे. कमी गुण असलेल्या द्रारिद्र्यरेषेखालील प्रमाणपत्र धारकांना मोफत धान्य किंवा ते २-३

रुपये किलो दराने मिळणार आहे. त्यापेक्षा जास्त गुण असलेल्या द्रारिद्र्यरेषेखालील प्रमाणपत्र धारकांना ७-१० रुपये दराने धान्याचा लाभ मिळणार आहे. इतर सुविधाही प्राधान्यक्रमाने द्रारिद्र्यरेषेखालील प्रमाणपत्र धारकांस प्राप्त होतील, अशी समितीस माहिती दिली. सन १९९७ व सन २००२ च्या द्रारिद्र्यरेषेखालील यादीमध्ये जास्त तफावत नसल्याकारणाने अजूनही विविध विभागांच्या एकूण २९ योजनाकरिता सन १९९७ च्या द्रारिद्र्यरेषेखालील प्रमाणपत्र धारकांची यादीच का वापरली जाते अशी समितीने अशी विचारणा केली असता त्यावर विभागीय सचिवांनी सन २००२ मध्ये जेवढी द्रारिद्र्यरेषेखालील कुटुंबे यादीमध्ये आहेत तेवढ्या लोकांना १९९७ च्या यादीनुसार योग्य भावाने धान्य मिळते. राज्य शासनाच्या विविध विभागांच्या एकूण २९ योजनाकरिता सन १९९७ ची यादी वापरली जाते, कारण वित्त विभागाकडून विविध विभागांच्या एकूण २९ योजनांकरिता निधि मंजूर केलेला असतो असा समितीस खुलासा केला.

समितीने पुढे दारिद्र्यरेषेखालील कुटुंबाची गणना करताना अनुसुचित जाती आणि अनुसुचित जमाती प्रवर्गातील लोकांची नावे काही ठिकाणी वगळलेली आढळून येत आहेत. इतर सामान्य द्रारिद्र्यरेषेखालील प्रमाणपत्र धारकांच्या मिळकतीची व मालमत्तेविषयची जी माहिती असते ती पडताळून पहिली तर त्यातून अनेक नावे वगळण्याच्या प्रक्रियेला गती मिळणे आवश्यक आहे असे आढळून येईल. तसेच काही ठिकाणी द्रारिद्र्यरेषेखालील कुटुंब यादीकरिता पात्र कुटुंबे यादीमध्ये नसतात. तथापि, अपात्र कुटुंबाचे नाव मात्र दारिद्र्यरेषेखालील कुटुंबाच्या यादीमध्ये असते. याकरिता प्रत्येक दारिद्र्यरेषेखाली असलेल्या कुटुंबाचे दस्तऐवज तलाठी वा तहसिलदारां कडून पडताळणी करून घेतल्यानंतरच त्यांचे नाव दारिद्र्यरेषेखालील कुटुंबाच्या यादीमधून वगळावे किंवा अंतर्भूत करावे असे मत व्यक्त केले. तसेच विभागीय सचिवांनी साक्षीच्या शेवटी सन २००२ मधील राज्यशासनाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार कुटुंबांचे सरासरी उत्पन्न, घराचा प्रकार, जमिन धारणेचा प्रकार इ. १ ते १३ निकषानुसार सर्वेक्षण करण्यात आले होते. लातूर जिल्ह्यातील एकूण ३,२३,२०६ कुटुंबापैकी राज्याने ठरवून दिलेली २९.८१% कुटुंबे दारिद्र्यरेषेखाली घेणेबाबत निर्देश दिल्यानुसार ९८,१३६ कुटुंबे दारिद्र्यरेषेखाली समाविष्ट झालेली आहेत. सर्वात कमी गुण प्राप्त झालेली कुटुंबे दारिद्र्यरेषेखालील समाविष्ट करण्यात आलेली आहेत. तालूका व गाव पातळीवर सुद्धा एकूण कुटुंबांच्या २९.८१% एवढीच कुटुंबे दारिद्र्यरेषेखाली घेणे बंधनकारक करण्यात असून सदर निकष राज्यातील सर्व भागास लागू आहेत. तसेच शासन परिपत्रक दिनांक २२.२.१० व दिनांक २५.३.२०१० च्या मार्गदर्शक

सुचनांनुसार दारिद्र्यरेषेखालील कुटंुबात अपात्र व्यक्तींची नावे यादीतून वगळण्याबाबत कार्यवाही चालू असून आतापर्यंत जिल्ह्यामध्ये एकूण ८१७ अपात्र लाभार्थ्यांची नावे वगळण्यात आलेली आहेत. असा समितीस खुलासा करण्यात आला.

अभिप्राय व शिफारशी :-

समितीने लातूर जिल्हा परिषदेमध्ये दिलेली भेट व त्यानुषंगाने विभागीय सचिवांची घेतलेली साक्ष यामध्ये असे निदर्शनास आले की, सन १९९७-९८ मध्ये रुपये २०,०००/- पेक्षा कमी उत्पन्न असणाऱ्या कुटंुबांना दारिद्र्यरेषेखालील कुटंुबे समजले जात असे. त्यानंतर राज्यातील दारिद्र्यरेषेसंदर्भात सन २००२ मध्ये सर्वेक्षण झाले त्यावेळी एकूण १३ निकष ठरविण्यात आले होते. त्यात सर्वेक्षण केलेल्या कुटंुबाचे असलेले घर, आर्थिक स्थिती, शिक्षण व वाहन यावरुन ० ते ५२ या प्रकारचे गुणप्रदान करण्याचे गुणदान पद्धती निश्चित करण्यात आले. ० गुण असतील तर अतिशय वाईट आर्थिक परिस्थिती समजली जाते. प्रत्येक जिल्ह्याची आर्थिक स्थिती वेगवेगळी आहे यात सातारा जिल्ह्यात दारिद्र्यरेषेखालील कुटंुबे १२% टक्के तर नंदूरबार जिल्हयात ते प्रमाण ७१% आहे. त्यामुळे नंदुरबार जिल्ह्यातील ०-४ चे गुणांकन असणारे कुटंुब व सातारा जिल्ह्यातील २५ गुण मिळणारे कुटंुब अशी दोन्ही कुटंुबे दारिद्र्यरेषेखाली येऊ शकतात त्यामुळे प्रत्येक राज्याचा कट ऑफ (किमान आवश्यकता) वेगळा आहे ही वस्तुस्थिती आहे.

प्रत्यक्षात ज्यांचे उत्पन्न जास्त आहे त्यांनीही या यादीत आपली नावे समाविष्ट केली होती. त्यांनी आपली नावे काढून घ्यावीत यासाठी वर्तमानपत्रात जाहिरात देवून त्यांच्या विरोधात फौजदारी कारवाईची जाहिरात देण्यात आली त्यामुळे बऱ्याच जणांनी आपली नावे मागे घेतली. ज्यांनी आपली नावे मागे घेतली नाहीत त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

समितीने साक्षीच्या वेळी दारिद्र्यरेषेखालील ४५ लाखापेक्षा जास्त कुटंुबांनी सादर केलेल्या माहितीत त्यांच्या मालमत्तेची माहिती असत्य असल्याने, सदर यादी तपासण्याची गरज आहे. यादीत अनुसुचित जाती व अनुसुचीत जमाती प्रवर्गातील कुटंुबीयांची नावे वगळण्यात आलेली असून इतर सामान्य कुटंुबे सधन असुनही त्यांची नावे यात समाविष्ट आहेत, त्यामुळे त्या प्रत्येक कुटंुबाने सादर केलेली कागदपत्रे तलाठी वा तहसिलदार कडून तपासून त्यानंतरच पुढील आवश्यक कार्यवाही करावी असे समितीने आपले मत व्यक्त केले.

राज्य **शासनाच्या विविध विभागांमधील साधारणतः २९ योजनांसाठी दारिद्र्यरेषेखालील लोकांची यादी ही प्रमाण म्हणून वापरले जाते. किंबहुना शासनाच्य योजनांचे यशापयश सदर यादीवर अवलंबून आहे. त्याचमुळे सदर यादी अचूक असणे गरजेचे आहे. सन २००२ मधील यादीचे अपात्र व्यक्ती/कुटंुबाची नावे मोठ्या प्रमाणावर आढळून आल्यामुळे शासनाच्या लोकोपयोगी योजनांचा फायदा इतरांना होत असल्याचे निदर्शनास येते.**

सबब, समिती शिफारस करते की, सन २००२ च्या यादीमध्ये अपात्र व्यक्ती/कुटंुबाची नावे समाविष्ट झालेली असूनही त्याकडे दूर्लक्ष केल्यामुळे सदर यादीची अचूकतेसाठी जबाबदार असणारे उपविभागीय अधिकारी यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी. तसेच यापुढे असे प्रकार होवू नयेत यासाठी अपात्र लोकांची नावे यादीतून वगळण्यासाठी राज्यभर कालमर्यादित विशेष मोहीम लवकरात लवकर घेण्यात यावी जेणेकरुन शासनाच्या योजनांचा लाभ दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांना होईल.

समिती अशीही शिफारस करते की, उक्त प्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस दोन महिन्याच्या आत देण्यात यावी.

जिल्हा परिषद, अमरावती

४.१ आदिवासी मुलींची आश्रमशाळा व वसतीगृह टेंब्रुसोंडा :-

पंचायती राज समितीने दिनांक ६ ऑगस्ट, २००९ रोजी अचलपूर पंचायत समिती अंतर्गत असलेल्या टेंब्रुसोंडा येथील आदिवासी मुलींची आश्रमशाळा व वसतीगृह याला भेट दिली. भेटीच्या वेळी समितीस खालील प्रमाणे त्रुटी आढळून आल्या.

मुलींना झोपण्यासाठी पलंगांची सोय नसणे गणवेश न देणे, कक्षात पंखे लावलेले नसणे, एका खोलीचे छप्पर वादळाने उडाल्यामुळे ती अद्याप छप्पर विरहीत असणे तसेच जेवण शिल्लक नसल्याने अन्नाचा दर्जा समितीस तपासता आला नाही. आश्रमशाळेवर महिला अधिक्षक नेमलेली नव्हती. धान्य कोठारात असलेली तूर डाळ निकृष्ट दर्जाची होती, पोह्यांना कुबट वास येत होता, त्यांचे नमुने तपासणीसाठी घेण्यात आले, धान्यासाठी नोंदवहीची मागणी केली तथापी ती मुख्याध्यापकांच्या कार्यालयात असल्याची माहिती समितीस दिल्याने समितीला अधीक्षकांच्या कार्यालयात साठा नोंदवहीची पहाणी करण्यासाठी जावे लागले, त्याबाबत अधीक्षकांना ताकीद देऊन साठा नोंदवही कोठारातच ठेवण्याच्या सूचना देण्यात याव्यात असे तत्कालीन प्रकल्प अधिकारी यांना समितीने निदेश दिले. पिण्याचे पाणी साठविण्याच्या टाकीची पहाणी केली असता त्याचा वापर होत नसल्याचे तसेच त्यात बरीच घाण पडल्याचे समितीस भेटीच्या वेळी आढळून आले, याबाबत संबंधित उप अभियंता उचित स्पष्टीकरण करु शकले नाहीत. या वसतिगृहाच्याच आवारात बहुद्देशीय सभागृहाचे बांधकाम खाजगी ठेकेदामार्फत सुरु असून माती मिश्रीत वाळू, सिमेंटचे प्रमाण कमी असल्याचे आढळून आल्याने कार्यकारी अभियंता यांनी सर्व कागदपत्रे घेऊन दिनांक ७ ऑगस्ट, २००९ रोजीच्या जिल्हा परिषद कार्यालयातील बैठकीस उपस्थित राहण्याच्या सूचना मुख्य कार्यकारी अधिकारी यांना समितीने दिल्या तसेच सदर मुद्दा विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी चर्चेला घेण्यात यावा, असा निर्णय समितीने घेतला.

समितीने मुलींच्या उपरोक्त आश्रमशाळा व वसतीगृहास दिनांक ६ ऑगस्ट, २००९ रोजी दिलेल्या भेटीच्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांची दिनांक ७ ऑगस्ट, २००९ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने आदिवासी विकास विभागामार्फत शासकीय आदिवासी आश्रमशाळा चालविल्या जात असुन या समाजासाठी राबविण्यात येत असलेल्या कल्याणकारी योजना बाबतची माहिती घेतली. समितीने या शाळेस भेट दिली असता तेथे असणाऱ्या सुविधा, कर्मचारीवर्ग यांकडे अधिक लक्ष देण्याची गरज आहे असे सामितीने मत व्यक्त केले. अप्पर

आयुक्त, आदिवासी विकास, यांनी त्यांच्या नियंत्रणाखाली मराठवाड्यातील ८ व अमरावती विभागातील ५ जिल्हे असून औरंगाबाद, अमरावती, पांढरकवडा, धारणी या ठिकाणी प्रकल्प अधिकारी आहेत अशी माहिती भेटीच्या वेळी दिली. समितीस भेटीच्या वेळी निकृष्ट दर्जाची गेल्या वर्षीची ४ क्विंटल डाळ आढळून आली त्यासंदर्भात संबंधितांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली. तथापि, त्यापूर्वीच संबंधितांकडून प्रकल्प अधिकाऱ्यांना खुलासा प्राप्त झालेला आहे. असे अप्पर आयुक्त, आदिवासी विकास यांनी समितीस सांगितले त्याची खातरजमा करावी असे समितीने सांगितले असता, अप्पर आयुक्त, आदिवासी विकास यांनी आश्रमशाळेतील धान्य साठ्यात नवीन डाळीची पोती होती. परंतु मागील वर्षाची निकृष्ट डाळीची पोती आढळून आल्याने त्यांनी अधिक्षकांना धान्य साफ करुन नंतर ते उन्हामध्ये वाळवून वापरण्यायोग्य ठेवण्याबाबत आदेशित केल्याची माहिती समितीला दिली. समितीस भेटीच्या वेळी तेथील पोहे, तेल यांनाही वास येत असल्याचे, तसेच कालबाह्य व खाण्यालायक नसलेला माल तेथे वापरला जात असल्याचे समितीस आढळून आले. निकृष्ट दर्जाचा माल बाजूला ठेवला होता. तो माल जर परत करावयाचा होता तर तो तेथे ठेवण्याची आवश्यकता नव्हती. त्याची ताबडतोब विल्हेवाट लावणे आवश्यक होते. अप्पर आयुक्त, आदिवासी विभाग यांच्या म्हणण्यानुसार जो नवीन माल आला तो सुद्धा समितीने नुमुना म्हणून घेऊन पहिला असता त्या मालाचाही घाणरेडा वास येत होता.

८० x ४० फुटाच्या जागेमध्ये १००-१०० मुली एकत्रिपणे राहतात, त्या इयत्ता १२ वीमध्ये शिकणाऱ्या आहेत, त्यांना शौचालयाअभावी प्रातःविधीसाठी उघड्यावर बसावे लागते. महिला शिक्षकांना निवासस्थानाची पुरेशी सोय नसल्यामुळे, एका खोलीमध्ये ४-५ महिला शिक्षिका रहात आहेत. मुलींना तेल, साबण व शैक्षणिक साहित्य दिले जाते. परंतु त्यांच्या खाजगी जीवनाशी निगडीत जे प्रश्न आहेत त्या संदर्भात काय उपाययोजना केली आहे अशी विचारणा केली असता, त्यावर अप्पर आयुक्त, आदिवासी विभाग यांनी माहिती देतो असे म्हटल्यावर समितीने त्याची पुर्ण कल्पना असुन प्रश्न विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा आहे असे म्हटले, त्यावर अप्पर आयुक्तांनी ग्रामिण रुग्णयालयामध्ये एक डॉक्टरचे पथक आहे. आदिवासी विकास विभागाने सदर पथकास वैद्यकीय अधिकारी व इतर साधन सामुग्रीसह एक गाडी दिली आहे असा खुलासा समितीस केला. समितीने या मुलींची आरोग्य तपासणी करण्यासाठी महिला डॉक्टरच असल्या पहिजे, असे प्रतिपादन केले असता, अप्पर आयुक्त यांनी स्त्रीरोगतज्ञ असल्यामुळे तपासणी करण्यासाठी वैद्यकीय अधिकारी कचरतात आता त्या आश्रमशाळेतील

मुलींची संख्या वाढली आहे, ज्युनिअर कॉलेज सुरु झाले आहे. समितीने समाज मंदिरच्या बांधकामाची पहाणी केली. तेथे बांधकामासाठी वाळूमध्ये माती मिसळली जात असल्याचे आढळून आल्याबाबत सांगितले. समाज मंदिराचे बांधकाम कशा पद्धतीने चालले आहे हे पाहण्यासाठी अप्पर आयुक्तांना कधी तेथे भेट दिली आहे काय, अशी विचारणी केली त्यावर अप्पर आयुक्त यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून ठेकेदार नेमला जातो. सार्वजनिक बांधकाम विभागाकडे दर्जा नियंत्रण विभाग आहे असा समिती पुढे खुलासा केला. आदिवासी आश्रमशाळेचा तसेच वसतीगृहाचा दर्जा सुधारण्यासाठी समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालकल्याण) जिल्हा आरोगय अधिकारी यांची समिती नियुक्त करावी आणि ठोस कार्यक्रम तयार करुन शासनाला अहवाल सादर करावा जिल्हा परिषदेने उपाययोजना केल्या तर यामध्ये अधिक चांगला फरक पडू शकतो. मुख्य कार्यकरी अधिकऱ्यांनी संबंधित अधिकाऱ्यांकडून ठोस कार्यक्रम तयार कुरुन घ्यावा आणि तो शासनास सादर करावा अशा सुचना समितीने साक्षीच्या वेळी केल्या.

उपरोक्त माहितीच्या आधारे अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांची माहिती मागविली.

१. आदिवासी मुलींची आश्रमशाळा व वसतिगृह टेंब्रुसोंडा या ठिकाणी समितीने दिलेलया भेटीमध्ये विद्यार्थ्यांना पुरविण्यात येणारे अन्नधान्य हे निकृष्ट दर्जाचे असून त्याला दुर्गंधी येणे, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था चांगली नसणे, पंखे नसणे इत्यादी बाबी निर्दशानस आल्या या सर्व बाबींस कोण जबाबदार आहे, त्यांच्याविरुद्ध कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,

२. सदर त्रुटींची पुर्तता करण्यात आली आहे काय ? नसल्यास, विलंब लागण्याची कारणे काय आहेत ?

३. सदर ठिकाणी सुरु असलेल्या बांधकाम साहित्यामध्ये देखील बऱ्याच त्रुटी आढळून आल्या, त्यासंदर्भात संबंधित कार्यकारी अभियंत्यावर कोणती कारवाई करण्यात आली अथवा येत आहे ?

उपरोक्त मुद्यांच्या अनुषंगाने समितीस जिल्हा परिषद, अमरावती यांच्याकडून खालील माहिती प्राप्त झाली.

१. सदर अन्नधान्याच्या पुरवठा नमुन्याप्रमाणे आश्रमशाळेमध्ये अन्नधान्याचा पुरवठा करण्यात येतो. या अन्नधान्याकरिता स्वतंत्र कोठीगृहामध्ये सुरक्षीत ठेवण्यात येते अन्नधान्य खराब होऊ नये

म्हणून वर्ग ४ कर्मचाऱ्यांकडून ऊन्हात वाळविण्यात आले तसेच फिल्डर करण्यात आले. विद्यार्थ्यांसाठी पिण्याच्या पाण्याकरिता स्वतंत्र विहिर खोदयात आली. विजपंपाद्वारे पिण्याचे पाणी टाकीमध्ये साठवणूक करण्यात येते. विहिरीमध्ये ब्लीचींग पावडरचा वापर करण्यात येतो. मुलींच्या निवासस्थानात एका खोलीमध्ये दोन याप्रमाणे वीस पंखे लावण्यात आले. भेटीच्या वेळी आढळलेल्या त्रुटींबाबत सदर शाळेचे मुख्याध्यापक व अधिक्षक हे जबाबदार आहेत. त्यांनी कामात दिरंगाई व निष्काळजीपणा केल्याचे दिसून येते. मुख्याध्यपकाच्या दरमहा होणाऱ्या सभेमध्ये अशा प्रकारच्या चुका भविष्यात होऊ नये याबाबत सुचना देण्यात आल्या.

२. सदर त्रुटींची पुर्तता विहित मुदतीत करण्यात आली आहे.

३. कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम, अचलपूर यांचे पत्र क्र.५४६ दिनांक २७/१/२०१० अन्वये समितीच्या भेटीच्या वेळेस सुरु असलेल्या बांधकामाकरिता वापरण्यात येणारे सिमेंट, रेती चांगल्या प्रतीची असल्याबाबतने सदर पत्रान्वये कळविण्यात आले. याबाबचा प्रयोगशाळेचा तपासणी अहवाल दिलेला आहे. **(प्रत सलग्न)**

तसेच उपरोक्त मुद्यांच्या अनुषंगाने आदिवासी विकास विभागाकडून खालील माहिती समितीस प्राप्त झाली.

१. सदर अन्नधान्य, पुरवठा आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांचेकडून खरेदी करण्यात येत असुन नमुन्याप्रमाणे आदिवासी विकास महामंडळामार्फत आश्रम शाळेमध्ये अन्नधान्य पोहोच करण्यात येते. पुरवठा करण्यात आलेल्या अन्नधान्याकरीता स्वतंत्र कोठीगृहामध्ये सुरक्षित ठेवण्यात येते. अन्नधान्य खराब होऊ नये म्हणून वर्ग-४ च्या कर्मचाऱ्यांकडून नियमित उन्हात वाळविण्यात येत असून वेळोवेळी आवश्यकतेनुसार फिल्टर मशिनने सुद्धा धान्य साफ करण्यात येते.

तसेच अन्न व औषध प्रशासन विभाग प्रयोगशाळा यांचे अहवालानुसार चावडीबिंजू, टिटंबा, चिखली, टेंबली, सुसर्दा, कुटंगा व सावलीखेडा या आश्रमशाळेत पुरवठा केलेले गहू व तांदुळ हे धान्य अन्न व औषध नियम, १९५५ नुसार उच्च प्रतीचे असल्याबाबत अहवालात नमुद केलेले आहे. तेच अन्नधान्य शासकीय आश्रमशाळा टेंब्रुसोडा येथे सुद्धा पूरविण्यात आले होते. (सदर अहवालाची छायंकीत प्रत सोबत जोडली आहे.)

विद्यार्थ्यांसाठी पिण्याच्या पाण्याकरिता स्वतंत्र कुपनलीका खोदण्यात आली असून विजपंपाद्वारे पिण्याचे पाणी ३०,००० लिटर क्षमता असलेल्या टाकीमध्ये साठवणूक करण्यात येत आहे. पिण्याच्या पाण्याच्या टाकीमध्ये ब्लिचिंग पावडर वापर करण्यात येतो.

मुलींच्या निवासस्थानात एका खोलीमध्ये ४ याप्रमाणे २० पंखे लावण्यात आले. भेटीच्या वेळी आलेल्या त्रुटींबाबत सदर शाळेचे मुख्याध्यापक व अधिक्षक यांना याबाबतच्या सुचना देण्यात आल्या आहेत.

२. सदर त्रुटींची क्र.१ नुसार अन्नधान्य साफ व स्वच्छ करण्यात आले आहे.

त्रुटी क्र.२ स्वतंत्र कुपनलीकेद्वारे पिण्याची पाणी ३०,००० लिटर क्षमता असलेल्या टाकीमध्ये साठवणूक करण्यात येत आहे. पिण्याच्या पाण्याच्या टाकीमध्ये ब्लिचिंग पावडरचा वापर नियमीत करण्यात येतो. (त्रुटींची पुर्तता विहित मुदतीत करण्यात आली आहे.)

३. शासकीय आश्रमशाळा टेंब्रुसोडा येथे समितीच्या भेटीच्या वेळी बहूउद्देशीय हॉलचे बांधकाम सुरु होते. सदर बांधकामाकरिता वापरण्यात आलेल्या विटा, रेती सिमेंट व इतर साहित्य याबबत कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे पत्र क्र.१०२५/प्र.आरेखक/दिनांक १०/२/२०११ नुसार चांगल्या प्रतीचे व प्रमाणानुसार वापर होत असल्याबाबत सदर पत्रान्वये कळविण्यात आले आहे. (याबाबतचा प्रयोगशाळेचा तपासणी अहवालात सोबत देण्यात येत आहे.)

विभागीय सचिवांची साक्ष :-

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती आणि सचिव, आदिवासी विकास विभाग यांनी दिलेल्या उपरोक्त लेखी माहितीच्या आधारे दिनांक २१ फेब्रवारी, २०११ रोजी समितीने विभागीय सचिवांची साक्ष आयोजित केली. भेटीच्या वेळी अचलपूर येथील टेंभ्रीसोडा अंतर्गत मुलींच्या वसतिगृहामध्ये असलेलया अन्नधान्याला दुर्गंध् ी येत असल्याचे समितीच्या पाहणीदरम्यान निदर्शनास आलेले होते. तथापी, अन्न व औषध नियम, १९५१ नुसार ते उच्च प्रतीचे असल्याबाबतचा अहवाल सादर केलेला आहे. या संदर्भात अन्न व औषध प्रशासनाच्या अहवालात अन्नधान्य उत्तम तसेच समितीच्या अहवालात ते निकृष्ट असल्याचा उल्लेख होता. यासंदर्भात आदिवासी विकास विभागाने अन्न पदार्थांची गुणवत्ता टिकावण्यासाठी ते उन्हात वाळवून त्यांना बोरीक पावडर लावणे व इतर पर्यायांबाबत सूचना पत्रक जाहीर केलेले होते. अन्न व औषधे प्रशासनाने सदर अन्नपदार्थ योग्य

असल्याचा अहवाल देण्याआधी या अन्न पदार्थांची तपासणी केली असेल त्यावेळी हे धान्य चांगले असेल परंतु हे धान्य नीट ठेवले न गेल्यामुळे त्यास कीड व दुर्गंधीचा प्रादुर्भाव झाला, त्यामुळे आदिवासी विकास विभागाच्या माध्यमातून अन्नपदार्थ टिकविण्यासाठी योग्य त्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच टेंभ्रीसोडा येथील मुलींच्या वसतिगृहामधील मुलींची वैद्यकीय तपासणी केल्यानंतर त्यांना दिनांक २९ फेब्रुवारी, २०१० रोजी सॅनिटरी नॅपकीन्स वितरीत करण्यात आल्या होत्या. या विषयी शासकीय आश्रमशाळा व खाजगी आश्रमशाळा या दोन्हामधील अधिकाऱ्यांना नोटीस बजाविण्यात आल्याची सचिव, आदिवासी विकास विभाग यांनी साक्षीच्या वेळी समितीस माहिती दिली.

समितीने पुढे शासकीय व खाजगी आश्रमशाळेतील अधिकाऱ्यांनी फक्त नोटीसा बजाविण्याच्या ऐवजी जर त्यापैकी रेक्टर, मुख्याध्यापक व इतर संलग्न अधिकारी किंवा कर्मचाऱ्यांना सदरहू अनियमिततेबाबत निलंबीत केले असते तर भविष्यकाळात अशा प्रकारच्या अनियिमितता घडू न देण्याचा संदेश अधिकाऱ्यांमध्ये पोहोचला असता असे समितीने मत व्यक्त केले.

समितीस आश्रमशाळा व इतर ठिकाणी भेट दिल्यानंतर तेथे अनेक बाबीसंदर्भात त्रुटी आढळून आलेल्या आहेत. तथापी, दिनांक १० फेब्रुवारी, २०११ रोजीच्या आश्रमशाळेच्या पत्रानुसार सदरहू अन्नपदार्थ हे प्रमाणित असून नियमानुसार खाण्याकरिता योग्य अशा प्रकारचे होते असे जिल्हा परिषदेचे म्हणणे होते. परंतु, समितीने ज्यावेळी प्रत्यक्ष तेथील अन्नधान्याची पाहणी केली, त्यावेळी त्यांना ते दुर्गंधीयुक्त व खाण्याकरिता अयोग्य अशा अवस्थेत आढळून आल्याचे समितीने मत व्यक्त केले. मुख्य कार्यकारी अधिकारी आणि इतर संलग्न अधिकाऱ्यांची प्रत्यक्ष त्या ठिकाणी जाऊन पाहणी करावी, व त्यासंदर्भातील अहवाल समितीला अधिकृतरित्या सादर करावेत. त्यानंतर तेथे जर काही अनियमितता आढळून आल्यास योग्य ती कारवाई ताबडतोब करावी कारण की, एक तर समितीने भेटीच्या वेळी काढलेल्या त्रुटी चुकीच्या आहेत किंवा अन्न व औषधे प्रशासनाचा अहवाल खोटा आहे. दोन्ही पैकी एक काहीतरी चुकीचे असणार हे निश्चित असा समितीने निष्कर्ष काढला. त्यावर विभागीय सचिवांनी मुलींच्या वसतीगृहाच्या बांधकामाविषयी बांधकाम विभागाने उत्तर देणे योग्य होईल असे मत व्यकत केल्या नंतर समितीने शेवटी वसतिगृहाच्या बांधकामवार नियंत्रण मात्र आदिवासी विकास विभागचेच होते. मग आदिवासी विकास विभागालाच अंतिम प्राधिकारी या नात्याने जाब विचारणार असे समितीने स्पष्ट केले, त्यावर विभागीय सचिवांनी मुलींच्या वसतिगृहामध्ये पुरविण्यात येणाऱ्या पिण्याच्या पाण्याची व अन्नधान्याची चाचणी केली जाते, त्यानंतर ते वसतिगृहामध्ये पाठविण्यात येते. मग ते धान्य

वसतिगृहामध्ये कोणत्या परिस्थितीमध्ये साठवून ठेवले जाते, टिकवले जाते. त्यावर धान्याची गुणवत्ता अवलंबून राहते असा खुलासा केला. विभागीय सचिवांनी पुढे विभागाचा कार्यभार स्विकारल्यानंतर एकूण साडे पाच कोटी रुपयांच्या १२० आश्रमशाळांच्या बांधकामांना मंजूरी घेतल्याचे तसेच काही नवीन आश्रमशाळा बांधण्याकरीताही त्यांनी प्रस्ताव सादर करुन मान्यता मिळाल्याची माहिती समितीस दिली.

समितीने टेंब्रुसोंडा आश्रमशाळेची ही अवस्था नाही तर संपूर्ण राज्यातील आश्रमशाळांचीही हीच अवस्था आहे. आदिवासी मुले शिकुन मोठी झाली पहिजेत आणि पुढे गेली पाहिजेत त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारली पाहिजे या उद्देशाने शासनाने कोट्यावधी रुपये खर्च करुनही ती मुले त्याच परिस्थितीत त्याच पद्धतीने रहाणार असतील तर त्या खर्चाचा काय उपयोग हा महत्वाचा प्रश्न आहे. सचिव आदिवासी विकास विभाग याबाबतीत चांगल्या सुधारणा करीत आहेत त्या संदर्भात समितीच्या मनात शंका नाही पण कडक पाऊले उचलली पाहिजेत आणि कडक कारवाई झाली पहिजे ही समितीची किमान अपेक्षा आहे.

शैक्षणिक संस्था तसेच शासकीय आश्रमशाळांना शासकीय सुट्या असतात, त्या दिवशी आश्रमशाळेतील शिक्षकांनी सकाळी शाळेत येऊन शासकीय कार्यक्रम केल्यानंतर घरी जावयाचे असते दिनांक १९/२/२०११ रोजी छत्रपती शिवाजी महाराज जयंती होती त्या दिवशी छत्रपती शिवाजी महाराजांच्या फोटोला हार अर्पण करुन मग शाळेला सुटी देणे आवश्यक होते. तथापी, सदर दिवशी शासकीय कार्यक्रम केला नाही कारण सुट्टी आहे म्हणून कोणी शाळेत आलेच नाही. ही आश्रमशाळा इयत्ता पहिला ते बारावी पर्यंत आहे या विद्यार्थ्यांना छत्रपती शिवाजी महाराज यांचा थोरपणा माहिती होण्यासाठी शिव जयंती कार्यक्रम शाळेत साजरा करणे अत्यावश्यक आहे हे लक्षात घेता शासनामार्फत सुट्यांचा जो तक्ता देण्यात येतो त्या परिपत्रकामध्ये या सुट्या कशासाठी देण्यात येत आहेत हे लिहिलेले असते. त्याप्रमाणे राष्ट्रपुरुषांच्या जयंती वा पुण्यतिथीच्या दिवशी त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन त्यानंतर मुख्याध्यापक, शिक्षक व कर्मचाऱ्यांनी घरी जावयाचे असते. पण सदर भेटीच्या वेळी संबंधित शिक्षक व इतर कर्मचाऱ्यांनी आदल्या दिवशी सही करुन दुसऱ्या दिवशी गैरहजर राहिलेल्याची बाब विभागीय सचिवांच्या निदर्शनास समितीने आणली असता त्यांनी यासंदर्भात चौकशी करण्यात येईल असे समितीस आश्वासन दिले.

समितीच्या भेटीच्या वेळी आश्रमशाळेतील धान्य साठ्याच्या ठिकाणी नवीन डाळीची पोती होती. परंतु, मागील वर्षाची निकृष्ट डाळीची पोतीही तेथेच आढळून आल्याचे जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्याने

मान्य केले आहे. तथापी, शासकीय अहवालात विसंगती असल्याचे साक्षीच्या वेळी जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणल्या प्रकरणी विभागीय सचिवांनी, नमुने बरोबर घेतले नसतील पण समितीने जे मुद्दे काढलेले होते त्यासंदर्भातील बरीचशी कार्यवाही सुरु असल्याचे समितीसमोर स्पष्ट केले.

तसेच पंचायत समिती चिखलदरा अंतर्गत देवगाव येथील आश्रमशाळेची मर्यादा लक्षात घेता त्या भागातील विद्यार्थ्यांना प्रवेश मिळत नाही ही बाब समितीने साक्षीच्या वेळी उपस्थित केली असता विभागीय सचिवांनी आदिवासी मुलांना वेगळे ठेवून शिक्षण देण्यापेक्षा शक्य तो त्यांना इतर मुलांबरोबर ठेवून शिक्षण दिले पाहिजे. आदिवासी मुलांना आश्रमशाळे ऐवजी जिल्हा परिषदेच्या शाळेत प्रवेश दिला तर त्यांच्यासाठी वेगळ्या आश्रमशाळा बांधाव्या लागणार नाहीत. त्यादृष्टीने त्यांची शिष्यवृत्ती वाढविण्याबाबत शासनस्तरावर विचार सुरु असल्याचे समितीसमोर नमुद केले.

अभिप्राय व शिफारशी :-

समितीने अमरावती जिल्हा परिषदेस दिलेल्या भेटीच्या वेळी अचलपूर पंचायत समिती अंतर्गत टेंब्रुसोंडा येथील आदिवासी मुलींची आश्रमशाळा व वसतीगृहात दिलेल्या भेटीच्या वेळी समितीस अन्नधान्यसाठ्यास दुर्गंधी येत असल्याचे व पिण्याचे पाणी दुषीत असल्याचे समितीच्या निदर्शनास आले आणि ही परिस्थिती राज्यातील बहुसंख्य आश्रमशाळांची आहे. समितीच्या टेंब्रुसोंडा आश्रमशाळा भेटीच्या वेळी तेथील अन्नपदार्थाचा दर्जा व स्वाद तपासणीसाठी समितीस एक थाळी उपलब्ध करुन देणे आवश्यक असताना तसे करण्यात आले नाही. समितीस जिल्हा परिषदेने दिलेल्या लेखी माहितीत मुलींच्या एका खोलीत दोन पंखे तर आदिवासी विकास विभागाने केलेल्या लेखी खुलाशात चार पंखे बसविण्यात आल्याची विसंगत माहिती समितीस प्राप्त झाली होती ही बाब विचारत घेता समिती येथे **नमूद करु इच्छिते की, शासन कोट्यवाधी रुपये खर्च करुनही आदिवासी आश्रमशाळांतील मुलं च्या परिस्थितीत परिवर्तन होत नसेल तर तो खर्च अनाठायी असून ते शासनाचे मोठे अपयश आहे.** तसेच शासकीय सुट्टीच्या दिवशी राष्ट्रपुरषांच्या (जयंती वा पुण्यतीथी) प्रसंगी राष्ट्रपुरुषांच्या प्रतिमेस पुष्पहार अपर्ण करण्याचा कार्यक्रम आयोजित करुन त्या नंतर शाळेला सुट्टी देणे आवश्यक असताना दिनांक १९ फेब्रुवारी, २००९ रोजी शिक्षक व इतर कर्मचाऱ्यांनी आदल्या दिवशीच हजेरीपटावर स्वाक्षरी करुन शासकीय सुट्टीच्या दिवशी ते शाळेत आले नाहीत ही अतिशय गंभीर बाब आहे. **जर शिक्षकच राष्ट्रपुरुषांच्या पुण्यस्मरणाची दखल घेत नसतील तर मग विद्यार्थ्यांकडून याबाबत काय अपेक्षा**

करावी अशी समितीने खंत व्यक्त केली. अशा कार्यक्रमास भविष्यात अनुपस्थित राहणाऱ्या शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक व कर्मचारी यांची एक वेतनवाढ रोखण्याची कारवाई शासनाने करावी अशी समिती शासनास शिफारस करित आहे.

तसेच चिखलदरा पंचायत समिती अंतर्गत देवगाव येथील मुलांप्रमाणे राज्यातील इतर ठिकाणी असलेली आदिवासी मुले शाळा प्रवेशापासून वंचित राहू नये यासाठी त्यांना जिल्हा परिषदेच्या शाळेत प्रवेश देवून, तसेच त्यांना इतर मुलांप्रमाणे शिक्षण देवून त्यांची शिषवृत्ती वाढविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

सदर **वसतीगृहातील आदिवासी मुलींना पुरविण्यात आलेले अन्नधान्य किड लागलेले व दुर्गंधीयुक्त असतानाही ते खाण्यास योग्य आहे असा अहवाल देणाऱ्या अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांची चौकशी करुन त्यांच्यावर कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.**

आदिवासी **विद्यार्थ्यांसाठी शासनाने साडेपाच कोटी रुपये खर्च करुन १२० आश्रमशाळांना मंजूरी दिलेली आहे तथापी, शासनाने कोट्यावधी रुपये खर्च करुनही आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक दर्जात फरक पडत नसले तर ही बाब शासनास निश्चितपणे भुषणावह नाही. याबाबत शासनाने कठोर पावले उचलून दोषींवर कारवाई करण्याची गरज आहे असे समितीचे मत आहे.**

तसेच, मुलींच्या खोलीत पंखे बसविण्याच्या संख्येबाबत जिल्हा परिषद व आदिवासी विकास विभाग यांनी समितीस सादर केलेल्या लेखी माहितीत समितीस विसंगती असल्याचे निदर्शनास आले आहे. **सबब, समितीस माहिती देताना त्यात विसंगती राहू नये यासाठी जिल्हा परिषद तसेच आदिवासी विकास विभाग यांनी एकमेकांशी समन्वय ठेवणे गरजेचे होते कारण पंचायती राज समिती ही राज्य विधानमंडळाची प्रतीकृती आहे त्यामुळे तीच्या समक्ष उपस्थित राहून तीस जाणूनबूजून खोटी वा विसंगत माहिती देणे ही समितीच्या विशेषाधिकार भंगाची बाब होऊ शकते असेही आपल्या निदर्शनास आणण्यात येत आहे. अतः जर अशा प्रकारे खोटी व विसंगत माहिती समितीला दिली जाणार नाही या दृष्टीने सर्व संबंधितांनी आवश्यक ती खबरदारी घेण्याचे दृष्टीने शासनाने परिपत्रकाद्वारे सविस्तर सूचना घ्याव्यात अशी समितीची शिफारस आहे.**

परिशिष्ट
समितीच्या बैठकींचे संक्षिप्त कार्यवृत्त

बुधवार, दिनांक २९ जानेवारी, २००९
स्थळ : जिल्हापरिषद सभागृह, सिंधुदूर्ग

उपस्थिती

१. श्री.सुभाष ठाकरे, वि.स.स.तथा समिती प्रमुख

२. श्री.रमेशभाई कदम, वि.स.स.

३. श्री.संपतराव अवघडे, वि.स.स.

४. श्री. सुभाष बने, वि.स.स.

५. श्रीमती अनुसया खेडकर, वि.स.स.

६. श्री. अतुल देशकर, वि.स.स.

७. श्री. टी.पी.कांबळे, वि.स.स.

८. श्री.हेमंत पटले, वि.स.स.

९. श्री.राजन तेली, वि.प.स.

१०. श्री.विक्रम वसंतराव काळे, वि.प.स.

११. श्री.रामनाथ मोते, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

श्री.वि.वा.देशमुख, उपसचिव

ग्रामविकास विभाग :

श्री.प्र.बा.हिरलेकर,उप सचिव

श्री.कृ.शे.कांबळे, अवर सचिव

सिंधुदूर्ग जिल्हापरिषदचे अधिकारी :-

१. श्री.राहूल रंजन महिवाल, मुख्य कार्यकारी अधिकारी.

२. डॉ.सुभाष पवार, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी.

३. श्री.पी.बी.पाटील, प्रकल्प संचालक, जि.ग्रा.वि.य.

४. श्री.एस.बी.शेळके, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, वरिष्ठ

५. श्री.ए.डी.कांबळे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी

६. श्री.शि.श.सुर्यवंशी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रापं).

७. श्री.वसंत विष्णू सागर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण).

८. श्री.किसन पवार, शिक्षणाधिकारी, प्रथमिक

९. श्री.बी. एम किल्लेदार, शिक्षणाधिकारी माध्यमिक

१०. श्री.प्रशांत पाटील पाटील, कायर्कारी अभियंता, बांधकाम

११. श्री.आ. द. शिंदे, कायर्कारी अभियंता, लधु पाटबंधारे

१२. श्री.न. बा. भोई, का.अ.ग्रा.पा.पु.व जिल्हा मुल्यंकन व सनियंत्रण चमू, जलस्वराज्य प्रकल्प.

१३. डॉ.आर.व्ही. कुलकणीर्, जिल्हा आरोग्य अधिकारी.

१४. श्री.एम.डी. वेताळ, कृषि विकास अधिकारी.

१५. डॉ.एस. बी. ठाकूर, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी.

१६. डॉ.एस. जे. पवार, अतिरिक्त जि. आ. अधिकारी.

१७. श्री.सदाशिव शेळके, वरिष्ठ लेखाधिकारी (वर्ग-१)

१८. श्री.चारुदत्त मराठे, शिक्षण अधिकारी, निरंतर शिक्षण.

१९. श्री. व्ही. व्ही. सागर, जिल्हा सुलभिकरण गट प्रमुख, जलस्वराज्य

संक्षिप्त कार्यवृत्त :

समितीने सिंधुदूर्ग जिल्हापरिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची सन २००३-२००४ च्या लेखा परिक्षापुनर्विलोकन अहवालातील सिंधुदूर्ग जिल्हापरिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदांवर साक्ष घेतली.

मंगळवार, दिनांक १२ फेब्रुवारी, २००९
स्थळ : जिल्हापरिषद सभागृह, धुळे

उपस्थिती

१. श्री.सुभाष ठाकरे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२. श्री.पद्माकर वळवी, वि.स.स.

३. श्री.डी.एस.अहिरे, वि.स.स.

४ ॲड.आशिष जयस्वाल, वि.स.स.

५ श्रीमती अनुसया खेडकर, वि.स.स.

६ श्री.टी.पी.कांबळे, वि.स.स.

७ श्री.विक्रम काळे, वि.प.स.

८ श्री.रामनाथ मोते, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

श्री.वि.वा.देशमुख, उप सचिव
श्री.म.सु.वाघमारे, समिती अधिकारी

मुख्य लेखा परिक्षक स्थानिक निधी (लेखा) :
श्री.अ.बा.सावंत, संचालक तथा मुख्य लेखा परीक्षक

विभागीय **प्रतिनिधी :**
श्री.र.ना.अंबरित, उप सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.
श्री.के.एस.कांबळे, अवर सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.

धुळे जिल्हापरिषदचे अधिकारी :-

१. दिपेंद्र सिंह कुशवाह, मुख्य कार्यकारी अधिकारी
२. श्री.ज्ञा.द.शिंदे, अति.मुख्य कार्यकारी अधिकारी
३. श्री.श्याम भोकरे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.)
४. श्री.मिलिंद धांडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.)
५. श्री.दिलीप रुपवते, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क.) (प्रभारी)
६. श्री.सोमनाथ बनसोडे, प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा
७. श्री.ह.ना.कोकणी, मुख्य लेखा व वित्त अधिकारी
८. श्री.गोकुळ बागले, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

९. श्री. भगवान सूर्यवंशी, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
१०. श्री.आर.टी.नागे, उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक)
११. श्री.जितेंद्र गाढे, अधिक्षक (शापोआ, प्राथमिक)
१२. श्री.सुधाकर सांगळे, कार्यकारी अभियंता (बांधकाम)
१३. श्री.शिं.गं.शिंदे, कार्यकारी अभियंता (लघुसिंचन विभाग)
१४. श्री.पंढरीनाथ पाटील, कार्यकारी अभियंता (ग्रापापु)
१५. डॉ.मधुकर पवार, जिल्हा आरोग्य अधिकारी
१६. श्री.शांताराम मालपुरे, कृषी विकास अधिकारी व जिल्हा कृषी अधिकारी
१७. डॉ.अरविंद गंधे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी
१८. श्री.सतीश वळवी, समाजकल्याण अधिकारी
१९. श्री.दिलीप रुपवते, गट विकास अधिकारी, धुळे
२०. श्री.भीमराव पाटील, गट विकास अधिकारी, साक्री
२१. श्री.चिंधा सोनावणे, गट विकास अधिकारी, (प्रभारी), शिंदखेडा
२२. श्री.तुषार माळी, गट विकास अधिकारी, शिरपूर
२३. श्री.जी.टी.महाजन, लेखा अधिकारी
२४. श्री.आर.बी.पाटील, उपायुक्त (वि), आयुक्त कार्यालय, औरंगाबाद
२५. श्री.अरविंद वळवी, तत्कालीन समाजकल्यण अधिकारी/सहाय्यक आयुक्त अपंग कल्याण, पुणे
२६. श्री.डी.आर.बारी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, नंदूरबार
२७. श्री.बी.एन.भापरे, माजी उपमुख्यं कार्यकारी अधिकारी (बा.क.)
२८. श्री.वाय.के.सासोटे, माजी शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
२९. श्री.अशोक मोकदम, तत्कालीन जिल्हा आरोग्य अधिकारी/जिल्हा आरोग्य अधिकारी, अमरावती
३०. श्री.एस.एस.जगताप, तत्कालीन जिल्हा कृषी अधिकारी/कृषी अधिकारी, अहमदनगर

संक्षिप्त कार्यवृत्त :

समितीने धुळे जिल्हापरिषदेचे मुख्यकार्यकारी अधिकारी यांची सन २००३-२००४ लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालातील धुळे जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदांवर साक्ष घेतली.

बुधवार, दिनांक ३ जुलै, २००९
स्थळ : जिल्हापरिषद सभागृह, लातूर

उ प स्थि ती

१. श्री.सुभाष ठाकरे, वि.स.स. तथा समिती प्रमुख,

२. श्री.राजन पाटील, वि.स.स.

३. श्री.संपतराव गणपत अवघडे, वि.स.स.

४. श्री.श्रीनिवास देशमुख (गोरठेकर), वि.स.स.

५. श्री.सुभाष बने, वि.स.स.

६. ॲड.आशिष जयस्वाल, वि.स.स.

७. श्री.अण्णासाहेब माने-पाटील, वि.स.स.

८. श्रीमती अनुसया खेडकर, वि.स.स.

९. श्री.टी.पी.कांबळे, वि.स.स.

१०. श्री.हेमंत पटले, वि.स.स.

११. श्री.राजन तेली, वि.प.स.

१२. श्री.विक्रम वसंतराव काळे, वि.प.स.

१३. श्री.रामनाथ मोते, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

श्री.म.सु.वाघमारे, समिती अधिकारी

ग्राविकास विभाग, मंत्रालय

श्री.एकनाथ मोरे, उप सचिव

मुख्य लेखापरिक्षक यांचे कार्यालल

श्री.शंकरराव चव्हण, प्रभारी मुख्य लेखापरिक्षक

२/-

..२..

लातूर जिल्हा परिषदेचे अधिकारी

१. डॉ.प्रवीण गेडाम, मुख्य कार्यकारी अधिकारी,
२. श्री.सूर्यकांत हजारे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,
३. श्री.गिरीष भालेराव, प्रकल्प संचालक,
४. श्री.परमेश्वर राऊत, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.),
५. श्री.किरण जाधव, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पं.),
६. श्री.शिवाजी पाटील, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क.),
७. श्री.राजकुमार मुक्कावार, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (जलस्वराज्य),
८. श्री.बिभीषण तांबडे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
९. श्री.द्वारकादास नोगजा, कार्यकारी अभियंता (ल.पा.),
१०. श्री.योगेश कुलकर्णी, कार्यकारी अभियंता (बां.),
११. श्री.विजय भरगंडे, कृषि विकास अधिकारी,
१२. श्री.राम होनमाने, प्रभारी शिक्षणाधिकारी (प्राथ.),
१३. श्री.लव डुरे, प्रभारी शिक्षणाधिकारी (माध्य.),
१४. डॉ.लक्ष्मण पवार, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी,
१५. डॉ.रावसाहेब वाघमारे, जिल्हा आरोग्य अधिकारी,
१६. श्री.लक्ष्मण वाघमारे, समाजकल्याण अधिकारी, जि.प.,
१७. डॉ.संजय तुबाकले, गटविकास अधिकारी, लातूर, पं.स.,
१८. श्री.प्रभाकर कदम, गटविकास अधिकारी,औसा,पं,स,.
१९. श्री.वसंत वाघमारे, गटविकास अधिकारी, निलंगा, पं.स.,
२०. श्री.शाम पटवारी, गटविकास अधिकारी, शिरुर अ.,पं.स.,
२१. श्री.नितीन दाताळ, गटविकास अधिकारी, देवणी, पं.स.,
२२. श्रीमती उषा बिरादार, गटविकास अधिकारी, उदगीर, पं.स.,
२३. श्री.शिवानंद खंदारे, प्रभारी गटविकास अधिकारी, जळकोट, पं.स.,
२४. श्रीमती कल्पना क्षीरसागर, गटविकास अधिकारी, अहमदपूर, पं.स.,
२५. श्री.तुकाराम नवले, गटविकास अधिकारी,चाकूर, पं.स.,
२६. श्री.तारु चव्हाण, गटविकास अधिकारी, रेणापूर, पं.स.,

संक्षिप्त कार्यवृत्त :

समितीने लातूर जिल्हापरिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची सन २००३-२००४ च्या लेखा परिक्षापुनर्विलोकन अहवालातील लातूर जिल्हापरिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदांवर साक्ष घेतली.

बुधवार, दिनांक ६ ऑगस्ट, २००९
स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, अमरावती

उपस्थिती

१. श्री.सुभाष ठाकरे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
२. श्री.राजन पाटील, वि.स.स.
३. ॲड.आशिष जयस्वाल, वि.स.स.
४. श्रमती अनुसया खेडकर, वि.स.स.
५. श्री.टी.पी.कांबळे, वि.स.स.
६. श्री.विक्रम काळे, वि.प.स.
७. श्री.रामनाथ मोते, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
श्री.यु.के.चव्हाण, उप सचिव
श्री.म.सु.वाघमारे, समिती अधिकारी

मुख्य लेखापरीक्षक स्थानिक निधी (लेखा),
श्री.माणिक कौरथी, लेखापरिक्षक

विभागीय प्रतिनिधी
ग्रामविकास विभाग
श्री.एकनाथ मोरे, उप सचिव
श्री.यशवंत गायकवाड, अवर सचिव

अमरावती जिल्हा परिषदेचे अधिकारी

१. श्री.ओमप्रकाश बकोरिया, मुख्य कार्यकारी अधिकारी

२. श्री.के.एम.अहमद, अतिरिक्त मुख्या कार्यकारी अधिकारी

३. श्री.बी.जी.सोमवंशी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.)

४. श्री.बी.डब्ल्यू.दिवाण, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पं.)

५. श्री.एन.बी.यादव, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (म.बा.क.)

६. श्री.एस.जी.शिंदे, प्रकल्प संचालक, जि.ग्रा.वि.यं.

७. श्री.एम.एच.हुसैन, मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी

८. डॉ.के.झेड.राठोड, जिल्हा आरोग्य अधिकारी,

९. श्री.पी.जी.भागवत, कार्यकारी अभियंता (बांधकाम)

१०. श्री.आर.के.भगत, कार्यकारी अभियंता (पाटबंधारे)

११. श्री.एम.सी.वाय.शाह, कार्यकारी अभियंता (ग्रा.पा.पु.)

१२. डॉ.एस.जी.चव्हाण, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी

१३. श्री.पी.पी.निकास, शिक्षणाधिकारी (प्रा.)

१४. श्री.एस.के.पवार, शिक्षणाधिकारी (मा.)

१५. श्री.वि.वि.चवळे, कृषी विकास अधिकारी

१६. श्री.एस.एच.शहाणे, समाज कल्याण अधिकारी

१७. श्री.पी.डी.चौधरी, उप अभियंता

१८. श्री.सुनिल निकम, गट विकास अधिकारी, पं.स.तिवसा

संक्षिप्त कार्यवृत्त :

समितीने अमरावती जिल्हापरिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची सन २००३-२००४ च्या लेखा परिक्षापुनर्विलोकन अहवालातील अमरावती जिल्हापरिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदांवर साक्ष घेतली.

सोमवार दिनांक १५ नोव्हेंबर, २०१०
स्थळ : विधान भवन,मुंबई

उपस्थिती

१) श्री.बबनराव शिंदे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
२) श्री. आण्णा बनसोडे, वि.स.स.
३) श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.
४) श्री. खुशाल बोपचे, वि.स.स.
५) श्री. विष्णू सावरा, वि.स.स.
६) श्री. अनिल भैय्या राठोड, वि.स.स.
७) श्री. नितीन भोसले, वि.स.स.
८) प्रा. सुरेश नवले, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
श्री.भाऊसाहेब कांबळे, सह सचिव

मुख्य लेखा परीक्षक स्थानिक निधी (लेखा
श्री.शं.धे.चव्हाण

विभागीय प्रतीनिधी
श्रीमती मालिनी शंकर, प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
श्री.सुधीर ठाकरे, सचिव, ग्रामविकास विभाग

संक्षिप्त कार्यवृत्त :

सन २००३-२००४ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालाच्या संदर्भात सिंधुदुर्ग व धुळे जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्याच्या दृष्टीने प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग व सचिव, ग्रामविकास विभाग यांची साक्ष घेतली.

मंगळवार, दिनांक ०८ फेब्रुवारी, २०११
स्थळ : विधान भवन,मुंबई

उ प स्थि ती

(१) श्री. बबनराव शिंदे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
(२) श्री. हणमंतराव पाटील बेटमागरेकर, वि.स.स.
(३) श्री. भाऊसाहेब कांबळे, वि.स.स.
(४) श्री. बच्चू ऊर्फ ओमप्रकाश कडू, वि.स.स.
(५) श्री. विष्णू सावरा, वि.स.स.

(६) श्री. दादाजी भुसे, वि.स.स.

(७) श्री. नितीन भोसले, वि.स.स.

(८) श्री. दिवाकर रावते, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

श्री. भाऊसाहेब कांबळे, सह सचिव

मुख्य लेखा परीक्षक यांचे कार्यालय,

महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई

(१) श्री. के.एम.विधाते, मुख्य लेखा परीक्षक

(स्थानिक निधी लेखा)

ग्रामविकास व जलसंधारण विभाग

श्री.व्ही.गिरीराज,प्रधान सचिव (रो.ह.यो व ज.सं.)

श्री. सुधीर ठाकरे, सचिव (ग्रामविकास व पंचायत राज)

जिल्हा परिषद, लातूर

श्री. एस.पी सिंह, मुख्य कार्यकारी अधिकारी

डॉ. हेमंत वसेकर, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी

श्री. गुलाबसिंह राठोड, प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा

श्री. प्र.मु. दीक्षित, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

श्री. सतिशचंद्र सुशीर, कार्यकारी अधिकारी (पाणीपुरवठा)

श्री. विलास जोशी, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

डॉ. एम.यू. गोहत्रे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी

संक्षिप्त कार्यवृत्त :

सन २००३-२००४ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालाच्या संदर्भात लातूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्याच्या दृष्टीने सार्वजनिक आरोग्य विभाग, प्रधान सचिव नियोजन विभाग, प्रधान सचिव, पाणी पुरवठा विभाग, प्रधान सचिव शालेय शिक्षण विभाग, सचिव, कृ.प.दु.म. व सचिव, ग्रामविकास विभाग यांची साक्ष घेतली.

बुधवार दिनांक २१ फेब्रुवारी, २०११
स्थळः विधान भवन, मुंबई.

उपस्थिती

१) श्री.बबनराव शिंदे, वि.स.स. समिती प्रमुख
२) ॲड.के.सी.पडवी, वि.स.स.
३) श्री.हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, वि.स.स.
४) श्री.भाऊसाहेब कांबळे, वि.स.स.
५) श्री.बच्चू उर्फ ओमप्रकाश कडू, वि.स.स.
६) श्री.बापूसाहेव पाठारे, वि.स.स.
७) प्रा.सुरेभाऊ लाड, वि.स.स.
८) डॉ.खुशाल बोपचे, वि.स.स.
९) प्रा.सुरेश खाडे, वि.स.स.
१०) श्री.अनिल राठोड, वि.स.स.
११) श्री.दादाजी भुसे, वि.स.स.
१२) प्रा.सुरेश नवले, वि.प.स.
१३) श्री.विक्रम काळे, वि.प.स.
१४) ॲड.उषा दराडे, वि.प.स.
१५) श्री.दिवाकर रावते, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय -
(१) श्री.भाऊसाहेब कांबळे, सह सचिव
(२) श्री.ना.रा.थिटे, अवर सचिव.

मुख्यलेखा परीक्षक, स्थानिक निधी (लेखा)
श्री.के.एम.विधाते, मुख्य लेखा परीक्षक, मुंबई

विभागीय प्रतीनिधी
श्री.संजय कुमार, प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग
श्री.यु.के.खोब्रागडे, प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग
श्रीमती मालिनी शंकर, प्रधान सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग
श्री.जयंत बाँटिया, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभाग
श्री.सुधीर ठाकरे, सचिव, ग्रामविकास विभाग
श्री.ओमप्रकाश बकोरिया, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती
डॉ.अर्चना पाटील, सह संचालक, आरोग्य सेवा संचनालय, मुंबई

संक्षिप्त कार्यवृत्त :

सन २००३-२००४ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालाच्या संदर्भात अमरावती जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्याच्या दृष्टीने प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, प्रधान सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभाग, सचिव, ग्रामविकास विभाग यांची साक्ष घेतली.

मंगळवार, दिनांक ०१ मार्च, २०११
स्थळः विधान भवन, मुंबई.
उ प स्थि ती

(१) श्री. बबनराव शिंदे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) ॲड. के.सी.पाडवी, वि.स.स.

(३) श्री. हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, वि.स.स.

(४) श्री. दिलीपकुमार सानंदा, वि.स.स.

(५) श्री. बापुसाहेब पठारे, वि.स.स.

(६) श्री. सुरेश खाडे, वि.स.स.

(७) श्री. विष्णू सावरा, वि.स.स.

(८) श्री. नितीन भोसले, वि.स.स.

(९) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

(१) श्री. ना.रा.थिटे, अवर सचिव

मुख्य लेखा परीक्षक कार्यालय, नवी मुंबई

(१) श्री. के.एम.विधाते, मुख्य लेखा परीक्षक

जलसंधारण विभाग, मंत्रालय

(१)श्री. व्ही.गिरीराज, प्रधान सचिव

जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर

(१) श्री. एकनाथ डवले, जिल्हाधिकारी

जिल्हा परिषद, लातूर

(१) श्री.सचीद्र प्रताप सिंह, मुख्य कार्यकारी अधिकारी

(२) डॉ.हेमंत वसेकर, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी

(३) श्री. सतिश सुषीर, कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद

संक्षिप्त कार्यवृत्त :

सन २००३-२००४ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालाच्या संदर्भात अमरावती जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्याच्या दृष्टीने सचिव, ग्रामविकास विभाग यांची साक्ष घेतली.

दिनांक - २० डिसेंबर, २०११

स्थळ : विधान भवन, नागपूर

उपस्थिती

समिती प्रमुख :

१. **श्री. बबनराव शिंदे, वि.स.स. तथा समिती प्रमुख**

समिती सदस्य :

२ **श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स.**

३ **श्री. दिलीपकुमार सानंदा, वि.स.स.**

४ **श्री. खुशाल बोपचे, वि.स.स.**

५ **श्री. सुरेश खाडे, वि.स.स**

६ **श्री. विष्णू सावरा, वि.स.स.**

७ **श्री. दादाजी भुसे, वि.स.स.**

८. **श्री. नितीन भोसले, वि.स.स.**

९. **प्रा. सुरेश नवले, वि.प.स.**

१० **श्री. विक्रम काळे, वि.प.स.**

११ **ॲड. उषा दराडे, वि.प.स.**

१२ **श्री. दिवाकर रावते, वि.प.स.**

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
श्री.भाऊसाहेब कांबळे, सह सचिव.
श्री.ना.रा.थिटे, अवर सचिव.

संक्षिप्त कार्यवृत्त

समितीने बैठकीत समितीच्या आठव्या अहवालाच्या प्रारुपावर विचार करुन ते किरकोळ सुधारणासह संमत केले.